
वर्ष - ४ अंक - १४
अंगारमळा
मार्च - २०२०
सहावे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, आळंदी
अ.भा. मराठी शेतकरी साहित्य चळवळ
आम्ही लटिके ना बोलू!
शनिवार ८ आणि रविवार ९ फेब्रुवारी २०२०
पिढ्यानपिढ्यांच्या अबोलतेला लिहिते-बोलते करण्याचा एक इवलासा प्रयत्न

Ankur®

सन १९७६ पासून

# अंकुर सीड्स ची वचनबद्धता ...

## नाविन्यपूर्ण संशोधन, शेती मार्गदर्शन, शेती विकास व गुणवत्ता !



### प्रमुख उत्पादने

**संकरित**

**बोलगार्ड कपाशी** : ३०२८, ३२२४, जय, सुवर्णा, पुष्कर
**धान** : ७०४२, ७४३४, ७५७६, ७८८, १३५५५
**मका** : आदित्य, भानु **बाजरी** : ०४५ **टोमॅटो** : रणवीर, श्री, २७९७
**भेंडी** : २०२८, २३३८, सिध्दी, गौरी **दुधीभोपळा** : १५८, नटवर, लंबोदर
**मिरची** : काजोल, ९३०, अमिशा, कांची, सारंगी **वांगी** : राकेश, किर्ती, हर्षल, १०९३, भटई
**कारले** : करीश्मा, रजत, टिल्लू, गिरीजा **टरबूज** : कशीश, सरस, ब्लॅक बॉल, शुगरक्यूब
**वाल** : डॉली, ४२७ **काकडी** : निराली, ऋतुजा, आलिया, शकीरा

**संशोधित**

**धान** : सोनम गोल्ड, पूजा गोल्ड, शतायु, ज्योतिका, साधना, एकवीरा, श्री-१०१
**सोयाबीन** : प्रभाकर, अग्रेसर **गहू** : केदार, शिवा **तुर** : चारू, प्रभा
**चवळी** : गोमती, व्ही.यु.-५, हरी, केतकी **वाल** : ऋतु, गोल्डी **वाटाणा** : राजस

www.ankurseeds.com

अंकुर सीड्स विश्वासाचे प्रतीक !

# अंगारमळा

**Title Code :** MAHMAR47450

**वर्ष ४ । अंक १४ । मार्च २०२०**

**मूल्य : रु. ५०**

**अंगारमळा** हे मासिक मालक, संपादक, मुद्रक, प्रकाशक, गंगाधर मुटे यांनी त्रिवेणी ऑफसेट वर्क्स, प्रयाग ३१२, दक्षिणामुर्ती चौक, महाल, नागपूर-४४००३२ येथे छापून, मु.पो. आर्वी छोटी, ता. हिंगणघाट, जि. वर्धा-४४२३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

संपादक
**गंगाधर मुटे**

अंक मांडणी
**प्रकाश बोपीनवार**

पंचवार्षिक वर्गणी : रु.२०००/-
द्विवार्षिक वर्गणी : रु.१०००/-
वार्षिक वर्गणी : रु. ६००/-

संपर्क :
**अंगारमळा**
**मु.पो. आर्वी (छोटी)**
**ता. हिंगणघाट, जि. वर्धा**
**पीन कोड - ४४२ ३०७**
Email : angarmala2016@gmail.com
Mob. 9730582004, 9730786004

**ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी :**
Angarmala
Punjab National Bank
Branch Hinganghat (Wardha)
A/c No. 0202002100027538
IFS Code : PUNB0020200

अंकातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**Title Code :** MAHMAR47450

## ✵ अंतरंग ✵

अनुक्रमणिका .................... १

अजित नरदेंचे जाणे! .......... संपादक .......... संपादकीय ........ २

आम्ही लटिके ना बोलू.......... युगात्मा शरद जोशी . अमृतकुंभ .......... ३

शेतकरी साहित्य स्वरूप दिशा .......... भास्कर चंदनशिव .. अध्यक्षीय भाषण .. ५

संमेलनाचे मोठ्या थाटात उद्घाटन .......... अंगारमळा ब्युरो..... सारस्वतांची मांदियाळी ......... ११

साहित्य संमेलन नव्हे, प्रशिक्षणाथी शिबीर .. रवींद्र दळवी ........ मागोवा ............ १५

आठोनीतलं साहित्य संमेलन .......... सु.पुं. अढाऊकर ... मनोगत ............ २५

६ वे शेतकरी साहित्य संमेलन : ठराव ....... अंगारमळा ब्युरो..... अलिबाग ठराव .... २७

माझे प्रशिक्षण आणि कृती शिबीर .......... सौ. प्रज्ञा बापट ..... अनुभूती ............ २८

पहिली भेट..... गुरु आणि शिष्याची ....... सुरेशचंद्र म्हात्रे ...... भावपुष्पांजली ..... २९

अजातशत्रू 'अजित' .......... अनंत देशपांडे ...... भावपुष्पांजली ..... ३१

अजित नरदे : एक लिबरल अर्थवादी आंदोलक .......... डॉ. श्याम अष्टेकर .. भावपुष्पांजली ..... ३३

Story of common man with uncommon zeal .......... Adv. Satish Borkar . भावपुष्पांजली ..... ३४

६ वे शेतकरी साहित्य संमेलन .......... प्रतिक्रिया .......... ३५

### - संपर्क प्रतिनिधी -

● **श्री. रामेश्वर अवचार**, विशेष प्रतिनिधी, मो. ९९६०३३३४३७ ● **प्रा. भुपेश मुडे**, मुंबई, मो. ९२२३५३८०३० ● **श्री. निवृत्ती करडक**, नाशिक, मो. ९३७१२५९५४५ ● **श्री. कडुआप्पा पाटील**, जळगांव, मो. ९३७१२७२७८१ ● **श्री. रमेश खांडेभराड**, जालना, मो. ९४२१३२३६१३ ● **श्री. मदन सोमवंशी**, लातूर, मो. ९७६४०६१८७७ ● **श्री. राजु झोटींग**, यवतमाळ, मो. ९६७३३४६६३५● **श्री. शालीक पाटील नाकाडे**, गडचिरोली, मो. ९४०४२२०४३९ ● **श्री. धोंडबा गावंडे**, वर्धा, मो. ९४२००६२८७६ ● **श्री. दिलीप भोयर**, अमरावती, मो. ९४२००७४८८४ ● **श्री. दगडूजी शेळके**, जळगांव, मो. ७७१९९६१०२५ ● **श्री. बाबासाहेब आवचार**, परभणी, मो. ९९२१६३०१७४ ● **श्री. गुलाबसिंह रघुवंशी**, धुळे, मो. ९४२१४७२३१२


# अजित नरदेंचे जाणे!

आज अजित नरदे आपल्यात नाहीत, असे मान्य करायला मन तयारच नाही अत्यंत सालस, सभ्य, सुसंस्कृत, अभ्यासू, समर्पित आणि तरीही लढवय्या स्वभाव असलेल्या व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या असलेले अजित नरदे आपल्याला शेवटचा रामराम करू शकतात, ही कल्पनाच कल्पनातीत आहे. जेव्हा त्यांच्या निधनाची पहिली बातमी कानावर आदळली तेव्हा त्यावर विश्वासच बसला नाही आणि आजही विश्वास बसायला तयार नाही; परंतु मन आणि भावना यांच्या पलिकडील शाश्वत सत्य नाकारताही येत नाही.

स्व. नरदे यांच्याशी माझी पहिली भेट १९८४ सुमारास घडली. त्या काळात संघटनेत लाखो कार्यकर्ते आणि तोलामोलाचे नेतृत्वगुण असलेले हजारो विचारवंत होते. त्या भाऊगर्दीत पहिल्याच भेटीत त्यांच्याशी ओळख झाली असेल किंवा त्यांच्याशी ओळख करून घ्यावीशी वाटली असेल तर तोच त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाचे पैलू ठरतो. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढायला निघालेला निघालेला शेतकरीपुत्र पण डोक्यावर कॅप, हातात कागदपत्रांनी भरलेली ब्रिफकेस आणि साहेबी पेहराव असा त्यांचा त्याकाळी पोशाख असायचा. वरकरणी रुबाबदार वाटणारे नरदे प्रत्यक्षात मात्र अत्यंत मनमिळावू आणि मृदुभाषी होते.

सहा वर्षांपूर्वी शेतकरी साहित्य चळवळीची मी जेव्हा कल्पना मांडली तेव्हा ती कल्पना उचलून धरणाऱ्या ज्या काही मोजक्या व्यक्ती शेतकरी संघटनेमध्ये आहेत, त्यापैकी ते एक होते. मला साहित्यातील काहीच कळत नाही अशी सुरुवात करून ते माझ्याशी तासनतास बोलायचे. यथाशक्ती संमेलनाला आर्थिक मदतही करायचे. ते अनेकदा शेतकरी साहित्य संमेलनात वक्ता म्हणून सहभागी झालेत आणि सर्वांना समजेल इतक्या सोप्या भाषेत जनुकीय तंत्रज्ञानासारखा क्लिष्ट विषय त्यांनी साहित्यिकासमोर ठेवला. अलिबाग येथील सहाव्या शेतकरी साहित्य संमेलनाच्या तंत्रज्ञान विषयक सत्रात ते अध्यक्षीय भूमिका निभावणार परंतु संमेलनाच्या तोंडावरच त्यांनी जगाचा निरोप घेतला.

नरदे यांच्या रूपाने भारतीय शेतकऱ्यांनी, शेतकरी संघटनेने आणि विशेषता: शेतकरी साहित्य चळवळीने एक अभ्यासू मार्गदर्शक गमावला आहे. त्यांच्या पावन स्मृतींना अंगारमळा परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!



# आम्ही लटिके ना बोलू

**युगात्मा शरद जोशी**



**अमृतकुंभ**

वर्तमानपत्रांत, मासिकांत आपल्या जवळच्यापैकी कोणाचे नाव, फोटो छापून आले म्हणजे आपण केवढ्या कौतुकाने तो अंक मिळवितो, वाचतो, जपून ठेवतो! म्हणजे साहित्यात आपले, आपल्या ओळखीचे आपण शोधत असतो. मग, खरे म्हटले तर, शेतावर राबणाऱ्या आपल्या सगळ्यांच्या आयुष्याचे चित्रण, प्रतिबिंब आपण साहित्यात शोधायला पाहिजे.

दर वर्षी पावसाळा यायच्या आधी बी-बियाण्यांची जमवाजमव, खर्चासाठी सावकाराची मिनतवारी, सोसायटीतली कारस्थाने, भानगडी, पाऊस येतो किंवा नाही याची चिंता, आल्याचा आनंद, येत नसला तर पोटात उठणारा भीतीचा गोळा, पिकावर येणाऱ्या तणांच्या आणि रोगांच्या धाडी, पीक उभे राहिल्यावर होणारा आनंद, बाजारात गेल्यावरची शोकांतिका, वाढते कर्ज, पुढाऱ्यांची मग्रुरी, आग लागल्यावर घरातून निसटताना व्हावी तशी गावच्या आयुष्यातून सुटण्याची ज्याची त्याची स्वतःपुरती धडपड या किड्यांसारख्या जीवनात लिहिण्यासारखी प्रचंड सामुग्री आहे; पण ७० टक्के लोकांच्या आयुष्याचे प्रतिबिंब साहित्यात कधीच पडले नाही.

खुरपताना, गवत काढताना, पिके काढताना, जात्यावर दळताना शेतकरी स्त्रियांनी उत्स्फूर्त म्हटलेली गाणी माळरानातच विरून गेली; मोटेवर, नांगरावर बैलांच्या साक्षीने शेतकऱ्यांनी ढाळलेले दुःखाचे कढ तापलेल्या जमिनीतच जिरून गेले.

शेतकऱ्याची पिके लुटून नेलेल्या दरोडेखोरलुटारुंच्या तळांवर गायिली गेलेली उत्तान, उन्मत्त गाणी साहित्यात आली.

मोठ्या लुटारूंनी दरबार भरवायला सुरुवात केल्यावर त्यांचे कौतुक करणाऱ्या भट-शाहिरांची प्रतिभा गाजली, त्यांचे मनोरंजन करणाऱ्या कलावंतिणींच्या लावण्यांचा पूर आला, संगीताच्या मैफिली झडू लागल्या.

पिके लुटून पेठा, शहरे वसवणाऱ्या व्यापाऱ्यांच्या, कारकुनांच्या समाजाचे साहित्य तयार झाले. साहित्य असो, संगीत असो, कला असो- शेतकऱ्याचे असे त्यात काहीच नाही.

इतिहास जसा विजेते लिहितात तसेच साहित्य-संगीत-कला सुद्धा विजेत्यांच्याच असतात. आमचे काहीच नाही; मग आम्हाला लुटणाऱ्यांच्या लावण्या-तमाश्यांत आम्ही आपले मनोरंजन करून घेऊ लागलो; पण त्यात चंद्रकांत राजाच्या मुलीची कहाणी आली, शेतकऱ्याच्या मुलीची नाही.

मग, त्यातले त्यात जवळचे साहित्य आम्हाला संतांचे वाटू लागले. कुठेतरी देव आहे, स्वर्ग आहे, मुक्ती आहे; एका नामात गुंगले की सर्व दुःखाचा विसर पडतो; 'शेवटी, देहाच्या दुःखाचा विचार काय करायचा? आत्मा अमर आहे.' या दिलाशात गावोगाव 'रुप पाहता लोचनी'च्या भजनात आम्ही सुटका शोधू लागलो.

शहरात गेलेली शेतकऱ्यांची पोरे शहरांत रमली. त्यात लिहिण्याचे कसब असणाऱ्यांनी गावाविषयी लिहिले; पण, शहराला काय पटेल, काय आवडेल याचाच विचार करीत लिहिले. 'हरामखोरांनो! तुम्ही माझे गाव लुटले, या पापाचा तुम्हाला झाडा द्यावा लागेल.' हा टाहो कोणी फोडला नाही. उलट, आपल्या ग्रामीण जन्मामुळे साहित्यात आपल्याला काही राखीव जागा असावी असा आक्रोश करणारी एक साहित्य आघाडी उभी झाली. शेतकऱ्यांच्या दुःखाचं भांडवल करून त्यावर साहित्यक्षेत्रात स्थानाचा जोगवा मंडळी मागू लागली.

दूरदर्शन आता गावोगाव येईल. आज त्यावर अनेक कथा चालू आहेत. हमलोग, खानदान, ये तो है जिन्दगी, रजनी इत्यादि, इत्यादि. या 'हमलोग' मध्ये आम्ही लोक कुठेच नाही. खानदानी शेतकरी कुटुंब नाही, या जिन्दगीत आमचे आयुष्य कोठेच नाही. पाच टक्क्यांच्या आयुष्याच्या चित्रणाने ९९ टक्के दूरदर्शन भरला आहे; पण, आपल्या घरच्या लुटून नेलेल्या वैभवाने भरलेल्या त्यांच्या महालांचे आम्ही जिभल्या चाटीत कौतुक करतो; 'हे आमचे आहे' या विचाराने संतापून उठत नाही.

हे अपरिहार्य आहे. साहित्य गुलामांचे नसते, विजेत्यांचे असते. सगळ्या जगाकडे बघायचे झाले तर इंग्रजी वाङमयाच्या वैभवशाली दरबारात इंग्रजीची ऐट दाखवणाऱ्या इंडियन लेखकांना इंडियातील ग्रामीण साहित्यिकांइतकेसुद्धा स्थान नाही. ताकद साहित्याची नसते, ताकद त्यामागील समाजाच्या सधनतेची असते. युरोपातील देश आज इंग्रजी शिकत नाहीत, अमेरिकी शिकतात. आम्ही अक्षरशः गुलामांचे गुलाम आहोत.

शेतकरी संघटनेच्या कामाच्या ओघात माझ्या लक्षात आले की, शेतकऱ्यांची जीभ कापली गेलेली आहे. दुसऱ्या कुणाची तरी जीभ लावूनच त्यांना बोलता येते. (ग्रामीण साहित्यिक शहरी विद्वानांची जीभ लावतात, पुढारी मुंबईची जीभ लावतात. अगदी सोसायटीचा सेक्रेटरीसुद्धा तालुक्याची जीभ लावून बोलतो. शेतकऱ्याच्या जिभेने कोणीच बोलत नाही.)

आम्ही बाललेले जगात ऐकले जाईल अशी साधने आमच्याकडे नसतील, शेती लुटून औद्योगिकीकरण करणारी व्यवस्था संपेपर्यंत ती साधने आमच्याकडे येणारही नाहीत; पण तोपर्यंत आमची जीभ तोंडात सलामत ठेवली पाहिजे. शब्द कसेही येवोत - अशुद्ध, बोबडे, वेडेवाकडे, तालहीन, सूरहीन, सौंदर्यहीन- पण त्यांतला अर्थ हा आमच्या अनुभूतीचा प्रामाणिकपणा टिकवणारा पाहिजे. साहित्याच्या बाजारी 'मुंगी व्याली, शेळी झाली' वाङमयाला उठाव असला तरी निदान आमच्या आमच्यात तरी आमचा निश्चय 'आम्ही लटिके ना बोलू'.

आमची गुलामगिरी, आमचे नाकर्तेपण अर्थकारणातून राजकारणात गेले, समाजकारणात गेले; साहित्यात आणि संस्कृतीच्या क्षेत्रात एक कण जिवंत ठेवू शकलो तर त्या बीजातून शेतकरी आंदोलन यशस्वी झाल्यावर नव्या प्रामाणिक संस्कृतीचे तरू कोटी कोटी तयार होतील.

(शेतकरी संघटक २५ जुलै १९८५)

◆ ◆ ◆

# बाबासाहेब देशमुख रावेरीकर शिक्षण प्रसारक मंडळ, यवतमाळ

र.नं. F 5634 CY





अध्यक्ष **चंद्रकांत देशमुख**

सचिव **सौ. अरूंधती देशमुख**

१) इंदु–बळवंत ॲग्रो रिसर्च सेंटर
२) देशमुख स्पोर्टस अकादमी
३) परित्यक्ता महिला उद्योग केंद्र
४) श्रीकांत देशमुख गोरक्षण
५) स्वत:चे हक्काचे घर (वृद्धाश्रम)

श्री बालाजी प्रसन्न



# श्री बालाजी कृषी केंद्र

बस स्टॅन्ड जवळ, वायगांव (नि.)
त.जि. वर्धा, मो. ९७६४०९७०३३

बि–बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, स्प्रिंकलर आणि स्प्रे पंप मिळण्याचे एकमेव ठिकाण.



**प्रोप्रा.**
**श्री. दिनेश (बालू) जाधव**

*सहाव्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनास शुभेच्छा*



**श्री. राजेश्वर बुके**
**चेअरमन**

**साईबाबा शुगर्स लि., गोद्री, ता. औसा, जि. लातुर**
**साईबाबा जनता सहकारी बँक, लातुर**



# कृषी उत्पन्न बाजार समिती, सिंदी

## उपबाजारपेठ सेलु

फोन क्र. सिंदी–०७१५५–२६६२३७, २६६३०६
सेलु–२२१२४५

## *शेतकऱ्यांना हार्दिक शुभेच्छा!*

१) समितीच्या सिंदी व उपबाजारपेठ सेलु येथील मार्केटला मोठ्या प्रमाणावर धान्य व कापसाची आवक रोज खरेदी विक्रीची व्यवस्था कापुस व धान्य लिलावाद्वारे विक्री यामुळे दर जास्त मिळतो.
२) उपबाजारपेठ सेलु येथे प्रत्येक मंगळवारला बैलबाजार भरविण्यात येतो.

**–: शेतकऱ्यांना सुचना :–**

१) शेतकऱ्यांनी आपला शेतमाल मार्केटमध्ये लिलावामध्येच विक्री करावा. २) आपला शेतमाल स्वच्छ करून आणावा यामुळे उच्च दर मिळण्यास मदत होते. ३) शेतमाल तारण योजना सुरू आहे. या योजनेचा लाभ घ्यावा. सोबत ७/१२ यात पेऱ्याची नोंद असणे आवश्यक. ४) ढगाळी वातावरण असल्यास माल विक्रीस आणु नये.

| **आय.आय. सुफी** | **रामकृष्ण उमाटे** | **विद्याधर वानखेडे** |
|---|---|---|
| सचिव | उपसभापती | सभापती |

**संचालक मंडळ :** बबनराव हिंगणेकर, केशरीवदजी खंगारे, दिलीपराव भजभुजे, राजेशजी जयस्वाल, अनिलराव जिकार, मो.युसुफ शेख, दिलीपराव ठाकरे, सौ.निलीमाताई ढंढारे, सौ.शिलाताई धोटे, गुणवतराव कडू, धनराजजी गिरी, संदीपराव वाणी, विठ्ठलराव कौरती, काशीनाथजी लोणकर, संजयराव तडस, अरुणराव चौधरी

# शेतकरी साहित्य स्वरूप दिशा

**भास्कर चंदनशिव**



**अध्यक्षीय भाषण**

अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे उद्घाटक मा. ज्येष्ठ पत्रकार श्री. संजय राऊत प्रमुख पाहुणे आणि अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळीचे प्रमुख कार्यवाह श्री. गंगाधरराव मुटे, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. शेषराव मोहिते इतर मान्यवर शेतकरी रसिक आणि भावा-बहिणींनो! या शेतकरी साहित्य चळवळीच्या अध्यक्ष, कार्याध्यक्ष आणि सन्माननीय पदाधिकाऱ्यांनी या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून माझी निवड करून सन्मानित केल्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो आणि आनंद व्यक्त करतो.

रायगड ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी म्हणूनच प्रसिद्ध होती. कुळवाडी भूषण म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांनी छत्रपती शिवरायांचा यथार्थ गौरव करून त्यांच्या कार्याचे पोवाडे गायलेले होते. कुळवाड्यापुढे एक आदर्श राजा म्हणून त्यांना स्थान दिलेले होते. आज याच रायगड जिल्ह्यातील अलिबाग या तालुक्याच्या गावी हे कुळवाड्यांचे साहित्य संमेलन भरते आहे. काही रंजन-मनोरंजन करण्यासाठी हे संमेलन आयोजित केलेली नसून काहीएक कृतिशील भूमिका घेऊन ही लेखन विषयक चळवळ उभी ठाकलेली आहे. पिढ्यानपिढ्या कष्ट करून हातात रूमनं आणि नांगर धरण्या ऐवजी आता आम्ही एक कृतिशील भूमिका घेऊन लेखणी हाती धरणार आहोत. अशी धारणा मनात धरून ही चळवळ उभी वाहिलेली आहे.कष्टाला-परिश्रमाला ही त्याची त्याची एक लोक भाषा असते, बोल भाषा असते. त्या भाषेला आणि लेखनाला प्रतिष्ठा मिळावी त्या अनुषंगाने चिंतन, वाचन, मनन आणि अभिव्यक्त कारणे घडावी. हे महत्त्वाची भूमिका या चळवळीने पत्करलेली आहे. राबत्या घरातून आलेल्याने हातात खुरपं धरण्या ऐवजी लेखणीचा सराव करावा आपण काहीतरी लिहू बघतो वाचू बोलू इच्छितो. काय बोलावं ? कसं बोलावं? काय लिहावं? कसं लिहावं? असे असंख्य आपलेच प्रश्न घेऊन इथं जमा झालो आहोत. खरंतर आपण कृषी जन संस्कृतीचे वारसदार आहोत. पण आज आपणच आपल्या पवित्र व्यवसायासह बेदखल का आणि कसे झालो? हा खरा प्रश्न आहे.

१८८५ साली न्या. रानडे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांना दुसऱ्या ग्रंथकार साहित्य संमेलनाचे निमंत्रण पाठविले होते. पण सदरील संमेलनात आमचे काय असेल ? आमच्या जीवनावर आणि आम्ही लिहिलेल्या ग्रंथावर थोडीच चर्चा असेल.आम्ही आमचेच प्रश्न आणि आमचे ग्रंथ जेव्हा लिहिली जातील असे ...! असे स्वाभिमान पूर्वक सांगून सदरील साहित्य संमेलनाचे निमंत्रण नाकारले होते. हा सारा इतिहास आणि भूमिका घेऊन आपण आपले आपले कष्ट,आपले प्रश्न मांडू आम्ही लटके ना बोलू ही भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

**२) कृषीमुलही जीवनम**

कृषीव्यवस्था हीच आपल्या जीवनाचे मूळ आहे जीवन याचा अर्थ पाणी असाही. होतो शेती-पाणी हे आपल्या जीवनाची मूलतत्त्व आहे. 'कृष' हा शब्द म्हणजे जमीन नांगरणे याअर्थी लक्षात घेतला जातो. मध्ययुगीन समाजजीवन हे ग्रामकेंद्रित, कृषिकेंद्रित होतो. गाव गाडा हि त्याची खरी ओळख होती.गावगाड्याच्या चौकटीत राहून संतांनी समाज जीवन चित्रित केले. जे जे भोगले, ते ते मांडले बरे झाले देवा, कुणबी केले या तुकोबाच्या विधानातील बरे झाले म्हणजे काय? आणि बरे झाले देवा निघाले दिवाळे। बरी या दुष्काळी पिडा केली।। या तुकोबाच्या दोन्ही बरे पण याचा काय अर्थ घ्यायचा? एक शेतकरी असण्यातील बरे पण तर दुसरे दुष्काळातील शेतीचे अनुभवात आलेले नैराश्य पूर्ण बरे पण कोणत्या अन्वयार्थातून आलेले आहे? त्यातील सारा त्यातील सारा सारा इतिहास आपणापुढे उलगडून जातो... यातील संभ्रमावस्थेची सोडवणूक त्यांच्याच आम्हा घरी धन, शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे यत्न करू।। या आशियातून दिलेली आहेत, सोडवलेली आहेत.. कोणत्याही संभ्रमावस्थेला शब्दातून मांडलेली मूल्यव्यवस्थाच मुक्त करू शकते.त्यासाठी शब्दाची चळवळ कृतीच्या पाठ बळातून साकारावी लागते. लोकसाहित्य मध्ययुगीन साहित्य, आधुनिक साहित्य, नवसाहित्य, समकालीन साहित्य हे अंतिमतः कृषिप्रधानच राहिलेले आहे.असे असूनही त्या त्या काळातील साहित्य व्यवहाराने मात्र कुळवाड्यांना अविद्यमान म्हणून बेदखल केलेले आहे. यातील वास्तव मात्र महात्मा ज्योतिराव यांच्या विचारसरणीतून तपासल्यास ते आग्रहाने शेतकऱ्याचा आसूड च्या उपोद्घातात म्हणतात. विद्येविना मती। गेली मतीविना नीती गेली। नीती विना गती गेली। गतीविना चित्त गेले वित्ताविना विना दारिद्र्य आले। एवढे अनर्थ एका अविद्येने केले।। या त्यांच्या अनुमानासह शेती,शेतकरी काळ गतीनुसार समजावून घेतला पाहिजे, रात्रंदिन आम्हा,युद्धाचा प्रसंग म्हणणारे तुकोबा नाही खरे शेतीचे अर्थशास्त्र कळलेले होते. शिवबा, तुकोबा आणि ज्योतिबा यांच्या विचाराचा अन्वयार्थच आज आपल्याला काही एक वास्तव दिशा दाखविणारे ठरणारे आहेत. मात्र ते आजच्या परिभाषेतूनच समजावून घेतले पाहिजेत हे मात्र खरे! कै. शरद जोशी यांना शेतकऱ्याचा राजा शिवाजी या ग्रंथातून

शेतकऱ्याचा आसूड-शतकाचा मुजरा या पुस्तकातून आणि तुकोबाच्या कृषी निष्ठेतून दाखवून दिलेला आहे... याच धारणेतून मध्ययुगीन काळातील वारकरी चळवळ, महानुभाव कळवळ, बसव चळवळ इत्यादी पायाच मुळी कृषीनिष्ठेतेचा होता. सारेच संत आणि महानुभाव हे कृषी व्यवस्थेतून गाव गाड्यातूनच अनुभव घेतलेले होते. आमची संस्कृती आमचे साहित्य आमचा इतिहास काय सांगत होता?

**३) आजची संभ्रमावस्था**

मित्र हो! आजचा काळ हा फारच संभ्रमावस्थेचा आणि कमालीचा अविश्वासाचा बनत चाललेला आहे, माणसाने माणुसकी पासूनच फारकत घेतल्याची चित्र आज दिसत आहे. माणसा-माणसातील संवाद च संपलेला आहे. संवाद अभावी आलेली मुके पण अतिशय घातक असते. आमच्या साऱ्या सामाजिक संस्थाच पॅरेलाइज(लकवा) झालेल्या दिसतात. माणसाची आरोग्य असा जेव्हा आपण शब्द वापरतो, तेव्हा त्यात त्याची अस्थिसंस्था,रक्ताभिसरण संस्था, मज्जासंस्था पचन संस्था आणि त्याची संस्थात्मक कार्य तपासित तशीच आपण आपले सामाजिक आरोग्य जेव्हा म्हणतो तेव्हा त्यात शिक्षण संस्था, धर्मसंस्था, राज्यसंस्था, अर्थकारण, समाजकारण, नैतिकता कुटुंब संस्था इत्यादी सामाजिक साऱ्याच अंगाचा आपण मूल्यात्मक पातळीवरून विचार करीत असतो. माणूस आजारी पडला तर डॉक्टर तपासणी करून काहीएक निदान करतो. त्यानुसार दवापाणी सांगतो, पण समाजच असा पॅरालाईज झाला, त्या त्या मूल्य व्यवस्थेपासून ढळला तर, त्याला काय आणि कोणते औषध पाणी द्यावे. आमच्या आजच्या या शिक्षणाची काय व्यवस्था आहे व आमचे धर्मकारण म्हणजे काय? समाजकारण कसले? राजकारणाची काय तत्वनिष्ठा? आमचे अर्थकारण कोणत्या अवस्थेला पोचले, आमच्या कुटुंबव्यवस्थेची ची काय अवस्था आहे.

खरंतर हा संभ्रम आजच निर्माण झाला असेही नाही. तर हरएक काळात असे अनेक संभ्रम निर्माण झालेले. आहेत पण त्या काळातील संभ्रमाला मूल्यात्मक शब्द रचनेनेच मार्ग दाखविला हेही तितकेच खरे आहे. आज महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील काही महत्त्वाचे संभ्रमित कालखंड अधोरेखित करता येणारे आहेत. त्यातील प्रमुख कालखंड म्हणजे तेराव्या शतकातील यादव काळाची उदाहरण देता येणारे आहेत. सम्राट रामदेवराव यादवांचा काळ तथाकथित सुवर्णकाळ म्हणून मानला जातो. पण याच साम्राज्यावर अल्लाउद्दीन खीलजी याने मोजक्या सैन्यानिशी हल्ला करून या सम्राटाचा पराभव केला. अलोट संपत्तीची लूट केली. याच काळात दुर्गा देवीचा तमाम सतत बारा वर्षाचा भीषण दुष्काळ पडलेला होता. सामान्यांच्या अस्वस्थमनाला शब्द त्याचा प्रयत्न करून एक प्रभावी चळवळ उभी केली. महात्मा चक्रधरांची महानुभाव चळवळ संत नामदेव- ज्ञानदेवाची वारकरी चळवळ, महात्मा बसवेश्वरांची बसण चळवळ इत्यादी चळवळीतून माणूस जागा करण्याचा-उभा करण्याचा प्रयत्न झाला. त्यांच्या वाङ्मयीन कृतीतून माणसात माणूसपण बहाल करण्याचा प्रयत्न झाला. या संभ्रमाचा आणि यादवांच्या पराभवाचा, चळवळीच्या उदयाचा आणि दुष्काळीशी बदलण्याचा काय आणि कसा अन्वयार्थ लावायचा.यात काव्य आणि कथा या साहित्य प्रकाराचे अतिशय महत्त्व मला वाटते. अभंग आणि टिळा यातून काहीही एक कांती प्रवण साहित्य चळवळ उभी राहिली. माणसाची जगण्याची मूल्यात्मकता सजग बनविली. याचे उदाहरण म्हणून महात्मा चक्रधरांची एकच टिळा उदाहरण म्हणून पाहण्यासारखी आहे. धांदुलमोक्षकथन यात धांदुल म्हणजे शेतकरी, कवणे एक गावी धांदुल असे तो इंद्रा घरी जाय म्हणजे कोण एक फाटका शेतकरी इंद्राच्या दरबारात आपली गा-हाने घेऊन जातो. आधी इंद्राच्या दरबारात छाती काढून बोलतो तुझ्या म्हसरूने माझे सोन्यासारखे कापसाचे शेत खाल्ले त्याची तू भरपाई दे! इंद्र त्याची भरपाई देऊन पृथ्वीतलावर पाठवितो ही झाली कथा, पण मला एकच गोष्ट अधोरेखित करावी वाटते, की आमचा फटका शेतकरी इंद्राच्या दरबारी कसा धिटाईने जातो. इंद्राच्या ऐरावताला 'म्हसर' म्हणून हिणवून बोलतो. आणि आपली नुकसानभरपाई मागतो यातून चक्रधरांनी धांदुलाचा स्वाभिमान आत्मविश्वास कसा अधोरेखित केलेला आहे. आज आपल्याला असे चित्र तहसील कार्यालय दिसते का? आत्मविश्वास आणि स्वाभिमान मारण्याचे काम कोणी केली? या साऱ्या तेराव्या शतकातील घटित याचा काय अर्थ लावायचा मूठभर सैन्यापुढे आमचा सम्राट का पराभूत झाला? मानवी मूल्यांना अर्थ देणाऱ्या सामान्याच्या भक्तिमार्गी दिसणाऱ्या चळवळी कशा आणि का निर्माण झाल्या? याचा अर्थ एवढाच की, राजा कोणीही असो तो आपणाला लुटणारच हा सामान्याला वाटणारा विश्वास येणार अनुभव सम्राटाच्या पराभवाला कारण झाला. रयतेचा म्हणजे शेतकऱ्याचा कुणालाच पाठवलं मिळत नव्हते. राजवटी विषयी असता असणाऱ्या शेतकऱ्यांचाच हा पहिला पराभव तेराव्या शतकात घडल्याचे दिसून येते. यातून काही अंशी वारकरी महानुभाव चळवळीतील साहित्याने संभ्रमातून समाजाला बाहेर काढण्याची त्याला आत्मा बळ देण्याचे कार्य केलेली होते. कारण साहित्य हे मूल्य व्यवस्थेला समोर जात असते. मूल्य राखणे, नव्या मूल्यांना जन्म देणे किंवा कालबाह्य मूल्यांचा त्याग करून सतत नवतेचा आणि परिवर्तनाचा ध्यास घेणे साहित्याला महत्त्वाचे वाटत असते.

**४) छत्रपती शिवरायांचे आज्ञापत्रआणि संत तुकोबाचे तत्त्वज्ञानं:**

सोळावे शतक ही तितक्याच संभ्रमाला कारण ठरत होते. याची खरी साक्ष आमचा दुष्काळाच्या इतिहासातून लक्षात येते. १६३० ते १७०३ या दरम्यानच्या काळात महाराष्ट्र देशी कुठे दुष्काळ पडल्याची नोंद नाही. पुढे मात्र शिव काळात शेतीसुधारणेस सुरुवात केल्यापासून दुष्काळाने महाराष्ट्रातून जे

कार्य केले ते तत्कालीन जगातील सर्वात श्रेष्ठ सम्राट आपल्या सर्व शक्ती एकवटून महाराष्ट्रात धुडगूस घालत असतानाही महाराष्ट्रात पाऊल टाकण्याची छाती दुष्काळाची झाली नाही. पुढे इंग्रज-मराठ्यांच्या युद्धात दारुगोळ्याच्या पोत्याच्या जागी धान्याची पोती निघून मराठ्यांची राज्य लयास गेले व इंग्रजी राज्याबरोबर दुष्काळाचेही आगमन झाले. हे इतिहास गत सत्य श्री चा.अ.दाभोळकर मांडतात. म्हणजे दुष्काळाच्या इतिहासात केवळ शिवकाळ का आणि कसा अपवाद राहिला कूळ वाड्यांना भूषण वाटणारा हा शेतकऱ्याचा राजा त्याच वास्तवापासून समजून घ्यावा लागतो शेतकऱ्याचा राजा शिवाजी हा लक्षावधी जनतेला ईश्वरी अवतार का वाटावा? यासंबंधीचे रहस्य मंडित असताना प्रसिद्ध विचारवंत नरहर कुरुंदकर म्हणतात. राजकारणाच्या पटावर औरंगजेबाविरुद्ध ते एक होते तरी त्यांनी औरंगजेबाला त्याचे पण पण जे अकबर बादशहा यांच्या थोरवीची आठवण करून दिली आहे. कुतूबशाहीशी त्यांचे संबंध प्राय:प्रेमाचे आणि मित्रत्वाचे होते. त्यांना आयुष्यभर ज्या वतनदारा विरुद्ध लढावे लागले, ती नुसती त्यांच्या धर्माची माणसे नव्हती तर त्यांच्या सोयर संबंधातील माणसे होती. घोरपडे,जाधव, निंबाळकर, सावंत,सुर्वे असे वतनदार नेहमीच त्यांच्याविरुद्ध राहिले. शिवाजी महाराजांचे विरुद्ध त्यांच्याच धर्मातील वतनदार का राहिले? या प्रश्नाचे उत्तर आणि लक्षवेधी जनतेची त्यांना ईश्वरी अवतार म्हणून का पहिले? या प्रश्नाचे उत्तर एकच आहे. रयतांना कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना आणि ग्रामइलाक्यातील सामान्यांना जाच आणि भय होते, ते वतनदार, जागीरदार, दरकदारांचे अशा वतनदाराचा बीमोड करणारा राजा जसा भेटवा. तसा त्यांच्या पोटातील भूक ओळखणारा कष्टाला, श्रमाला स्वाभिमानाची जोड देणारा तारणहार ही भेटला संत तुकारामा सारख्या कुणबी पणाचा अभिमान बाळगणाऱ्या संताने तत्कालीन दुष्काळाचे, शेतकऱ्याच्या दैनेचे त्याच्या अपार कष्टाचे त्याच्या एकूण शेती विषय अर्थशास्त्राचे वास्तविक निरुपम आपल्या अभंगातून केलेले आहे. काव्य, तत्त्वज्ञानं आणि जीवनाचे कठोर वास्तव तुकारामा इतके परखडपणे कोणीही केल्याचे दिसत नाही. आणि यास साऱ्या वस्तुस्थितीवर मात करणारा राजा भेटला याचे समाधानही तुकारामाने व्यक्त केले आहे. महात्मा ज्योतिराव यांनी म्हणूनच दोघांचेही कौतुक केलेले आहे. कुणब्यातील साधू तुकाराम तर कोळीवाड्यांना भूषण असणारा राजा शिवाजी मराठी मानाची हे दोन प्रतीक महात्मा ज्योतिरावांनी ऊर्जा स्थानी ही स्वीकारलेली होती. तुकारामाची गाथा म्हणजे तुकोबाच्या आत्मचरित्र जसे ठरते तसे ते तत्कालीन समाजमनाचे चरित्रही ठरते. इतके ते समाजजीवनाशी, लोकजीवनाशी एक रूप झालेले होते तसेच राज्यकर्ता आणि साहित्यिक कलावंताचे संबंधही आजच्या वर्तमान घडीला लक्षात घेण्यासारखे आहेत. छत्रपती शिवरायांच्या भेटीचे निमंत्रण नम्रतापूर्वक नाकारणारे तुकोबा म्हणतात.

**तुम्हा पाशी आम्ही येऊनिया काय।**
**वृथा सीन आहे चालण्याचा।।**
**मागावे हे अन्न तरी भिक्षा थोर।**
**वरणासी हे धार चिंध्या बिदी।।**
**निद्रेशी आसन, उत्तम पाषाण।**
**वरी आवरण आकाशाचे।।**

ही तुकारामांची भावना काय दर्शविते? शिवरायाच्या एकूणच कृतीवर आणि उक्तीवर तुकोबाच्या विचाराचा फार मोठा प्रभाव होता हे अभ्यासकाचे मत हे त्यांच्या आज्ञापत्रातील अज्ञानातून स्पष्टपणे जाणवते. रयतेची तसंनस न हलू द्यावी, भाजीच्या देठालाही हात लावू नका, रयतांना झाडे लेकरा ऐशी वाढविली असे शेतकऱ्याचा शेतसारा माफ करावा. बौ. बारदाण्यासाठी तगाई द्यावी इत्यादी संदर्भ लक्षात घेतल्यास आजही आपण लोकशाहीच्या काळात या राजेशाहीचा गौरव का करतो हे लक्षात येते. बळीराजा, शिवराजा आणि शाहू राजा या राजाचे स्मरण करण्यात रयतेला कोणती प्रेरणा मिळते?

रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग म्हणणाऱ्या आपल्या कुणबी कुळाला सार्थ अभिमान बाळगणारा तुकोबा आजच्या आत्महत्या करणाऱ्या कुणब्याच्या वंशजांनी पुन्हा एकदा नव्याने समजावून घेतला पाहिजे. एक विद्रोही विचार-कृतीचा संत कवी म्हणून त्याची ओळख महत्त्वाची आहे. कठीण वज्रासही भेदण्याचे बळ आणि ऊर्जा बाळगणारा नाठाळाच्या माथी काठी मारण्याची धमक आजच्या शेतकरी कुणब्यांनी समजून घेतली पाहिजे. आत्महत्या हा भ्याड पणाचा, संघर्षापासून पळून जाण्याचा मार्ग आहे. आपले जीवन संपविणे म्हणजे जीवनाची मोल आणि मूल्य न समजण्याचेच द्योतक आहे.

अस्सल मराठीपणाचे भान असणाऱ्या तुकोबांना राष्ट्राचे मूळ सामर्थ्य कळलेले होते. शब्द, भाषा, जीवन, माणूसपण याचा फार मोठा संबंध त्याच्या-त्याच्या मूल्य-भावासह तुकोबांना समजून आलेला होता. आम्हा घरी धन, शब्दाचीच रत्ने। शब्दाचीच शस्त्रे यत्ने करू।। शब्द चि जीवाचे जीवन। शब्दे वाटू धन जन लोका।। ना वाटून टाकू त्यांची प्रतिज्ञा म्हणजे, सामान्यांना बोलकं करणं, त्याला त्याची-त्याची वाचा देऊन व्यक्त होण्याचा मार्ग सुकर करणे त्यांना अतिशय महत्त्वाची वाटत होते. वैदिक काळात शूद्रातिशूद्रांना संस्कृत वाणी उच्चारण्याचा शिकण्याचा अधिकार नाकारण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी स्वतः व्यक्त होऊ नये. भाषा आहे व्यक्त होण्याचे प्रभावी प्रमुख कारण आहे. भाषा, बोली, पण त्यातही शुद्ध-अशुद्धतेच्या परिमाण टाकून शूद्रतिशूद्रांना उच्चार आणि विचार स्वातंत्र्यापासून दूर ठेवले गेले. वाणी वर्चस्वाने सामान्याचे काही शोषित झालेल्या समाजाची अवस्था तुकोबांना प्रकर्षाने जाणवलेली होती. म्हणूनच शब्दाचे शस्त्र लोकात वाटून टाकण्याचे क्रांतिकारक भाषा करतात. म्हणूनच अनेक कवींना, संत, महंतांना शब्दाचा सारा वागव्यवहार आणि

त्याचे शास्त्र सारखे बळ समाजाच्या साऱ्या चळवळ कर्त्यांना जाणवलेले होते. म्हणूनच महात्मा चक्रधर संत नामदेव,ज्ञानदेव, बसवेश्वर,संत कबीर इत्यादी सर्वोच्च पंथीयांनी लोकभाषेचा आवर्जून वापर केला. अनुयायी यांना तसा दंडक घालून दिला. त्याच लोकभाषेतून ग्रंथाची निर्मिती केली तुमचे अस्मात –कस्मात मी नेने गा। मज चक्रधर निरूपत्री काय लयाची पुसा।। हा भाषिक आग्रह महत्त्वाचा आहे. जे त्यांची भाषा आणि जी त्यांची भाषा असा असा फरक शोषण व्यवस्थेच्या सोयीने करून घेतलेला होता. आजही भारत इंडियाची याची भाषा काळापरत्वे बदल असतील तरी वृत्ती–प्रवृत्ती भाषिक पातळीवरही कायम आहे.

**५) आजही ही शेतकऱ्याच्या आसुडाचे आहे आणि ग्रामरचना आहे**

पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजी राजवट आणि या राजवटीचेही अनेकांनी स्वागत केले वर्ण वर्चस्वाला. पुरोहित शाहीला खतपाणी घातले. उत्तर पेशवाईतील सारे सामाजिक, आर्थिक, धार्मिक तपशील पाहू जाता बरे झाले इंग्रजांचे राज्य आले नसता आमचे काय झाले असते? लोकहितवादी सारख्या त्या काळातील जाण त्यांच्या प्रतिक्रिया या साऱ्या पेशवाईच्याच धांडोळा घेणाऱ्या होत्या. त्यातूनच इंग्रजी राजवट स्थिरावत गेली. प्रशासन व्यवस्था, न्यायदान व्यवस्था, शिक्षणाच्या सार्वत्रिकता, जमीन सुधारणा कायदे, अमानुष रूढी–परंपराच्या विरोधातील कायदे–कानून यामुळे ही राजवट म्हणजे प्रबोधन युगाची सुरुवात म्हणूनच ओळखली जाते. संत–महंतांच्या युगानंतरचे हे दुसरे प्रबोधन युग म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्य, समता, मानवता आणि विज्ञान यातूनच या या काळाने मानवतेचा मार्ग पत्करल्याचे दिसते. साहित्य आणि संस्कृतीवर प्रभाव टाकून नव्या आधुनिकतेला कारण ठरत गेले. इंग्रजी शिक्षण इंग्रजी विचारसरणीचा साहित्य तत्त्वज्ञानाचा प्रभाव आणि स्वीकार या काळातील भारतीय नवशिक्षित यांच्या विचारसरणीला प्रेरक आणि कारक ठरत गेला.निबंध माला, राजपत्रे, दर्पण महात्मा फुले यांची सत्यशोधक समाज आणि इतर समाज संस्थाच्या माध्यमातून मन्वंतर घडत होते. कुणबी कुळाचा अभिमान सांगणारा महात्मा ज्योतिबा आपला सारा सामाजिक इतिहासातील लूटमारीच्या टप्प्यांचा धांडोळा घेत होता. त्या–त्या काळातील भीषण दुष्काळाच्या परिणामाचे संदर्भ तपासीत होता. त्याचे सप्रमाण विश्लेषण करीत होता. त्यादृष्टीने शेतकऱ्याचा आसूड नावाचा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा आहे. रानटी काळातील लुटालूट टोळ्यांची आक्रमण टोळ्यांतून उदयास आलेली राज पद्धती राज्याची रयातावर लादलेली करसारा पद्धती त्यातून आलेली गुलामगिरी, वेठबिगारी कमी दाम देऊन अधिक कष्ट लुटणारी प्रवृत्ती आणि अखेरी शेतीमालाच्या भावातून होणारी लूट महात्मा ज्योतिराव यांनी मांडलेली आहे. तर याच काळात शतपत्रे लिहून शिक्षणाचा आग्रह धरून कठोर भाषेत व्यवस्थेला खडसावणाऱ्या जनहिवाद्यानि ग्रामरचना नावाच्या निबंध पुस्तिकेतून मांडलेली ढळढळीत वास्तव लक्षात घेण्यासारखे आहे, ते लिहितात

एक बिघा ऊस, एक बिघा हळद आणि एक बिघा लसूण याचा प्रत्यक्ष उत्पादन खर्च काढून त्यातून निघणाऱ्या मालाची बाजारपेठेतील विक्री किंमत काढून दाखविलेली आहे. त्यात उसासाठी रुपये २६८ हळदीसाठी रुपये १८७ आणि लसूण साठी रुपये ६० इतका खर्च असून त्यातून निघणाऱ्या उत्पादित मालाला बाजारात मिळणारी किंमत अनुक्रमे रुपये १३० रुपये रु १०० आणि रुपये २५ म्हणजे या साऱ्या रोजगारात शेतकऱ्याच्या हाती धोंगडी आणि लंगोटी शिवाय आशा नाही हा नेहमीचा तोटा भरण्यास सावकार पाहिजे. याशिवाय त्याची गत नाही.... तर महात्मा फुलेंनी शेतकऱ्याचा आसूड मधून एक माळवीवाल्या शेतकऱ्यांची कथाही मोठी हृदयस्पर्शी शोषणावर झगझगीत प्रकाश टाकणारी आहे.

बाबा पद्मनजी यांची यमुनापर्यटन नावाची धर्मांतर आणि हिंदू स्त्रियांचे अनेक पदरी दुःख मांडणारी कादंबरी बळीबा पाटील ही सत्यशोधक समाजाचे कृष्णराव भालेकर यांची शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारी कादंबरी हरीभाऊंची काळ तर मोठा कठीण आला नावाची दुष्काळाचे विदारक सत्य मांडून शेतकऱ्यांची दैना विचित्र करणारी कथा महात्मा फुले यांची अखण्ड आदी काव्यरचना आणि तृतीय रत्न नावाचे शेतकऱ्यांची लूटमार चित्रित करणारे नाटक केशवसुतांनी गोष्टी घराकडील वदता गड्या रे नावाची गावची आठव नोंदवणारी कविता लो.टिळक–आगरकर यांनी वृत्रपत्रातून सामाजिक आणि राजकीय जागृतीचे केलेले कार्य १८७७ चा दुष्काळ, प्लेगाची साथ ,खज फाडी चे बंड, सावकारा विरुद्ध चे उठा, कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे यांच्या शेतकरी आणि कामगारांच्या चळवळी तर दुसरीकडे स्वातंत्र्याच्या चळवळीची बांधाबांधी होत होती. सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्याची मागणी होत होती. म.ज्योतिराव फुले यांनी स्थापना केलेल्या 'सत्यशोधक समाजाची' चळवळी प्रामुख्याने दोन दिशांनी प्रवाही होताना दिसते. या दोन्ही चळवळीच्या दिशा कधी परस्पर पूरक तर कधी परस्परविरोधी कार्य करीत होत्या. या दोन्ही प्रवाहांच्या परस्पर संघर्षातून व भिन्न स्वरूपाच्या भूमिकेतून देशाच्या स्वातंत्र्याच्या मागणीला व त्याच्या स्वरूपाला खरा अर्थ प्राप्त होत होता या दोन्ही चळवळीच्या प्रमुखांनी आपल्याला कर्तृत्वाने उभ्या भारत खंडात क्रांती युग निर्माण केले होते. यात डॉ बाबासाहेब आंबेडकर युगाने भगवान बुद्ध, संत कबीर आणि महात्मा जोतिराव फुले यांच्या समग्र तत्त्वज्ञानाला नवविज्ञानवादी आशय होऊन सर्व हारा समाजाच्या उत्थानाचा मार्ग दाखविला. हजारो वर्षाच्या अनेक विविध पातळीवरील गुलामगिरीच्या शृंखला तोडल्या तर याच काळात म.गांधी युगाने आपल्या कर्तृत्वाने भारतीय जनसामान्यांची मने आपल्या कडे आकर्षित करून घेतले. सत्य अहिंसा सत्याग्रहासारखी हत्यारे वापरून सत्य शोधकी वारसा सरमिसळून गांधीवाद कार्यरत बनवला

राजकीय आणि सामाजिक सुधारणा वादाची भूमिका एकवटून आंदोलन उभे केले समाजकारण, धर्मकारण, राजकारण अर्थकारण, नैतिकता इत्यादी घटकांना आपल्या विचारात एकत्र घेऊन म. गांधी भारतीय राजकारणात उतरले. देश आणि देशातील दारिद्र्य पाहिले. अज्ञान, दारिद्र्य, जातीयता, धर्म वाद प्रचंड दुष्काळ इंग्रजी लुटारू वृत्ती, शेतकऱ्यांची दैना आणि उपासमार यांच्या दृष्टीतून सुटली नाही. या साऱ्याचा परिणाम त्यांच्या कृतीयुक्तीत सामावला. पंचापरिधान करून सामान्यांचे जीवन पत्करले. झोपडीत राहणे, ग्रामसफाई, संडाससफाई, प्रार्थना, भजन, साधा फलाहार, शेळीचे दूध सात्त्विक दिनचर्या सामान्यांना आपलं करण्यास कारण ठरली. रयतेची बापूजी बनलेल्या गांधीजींनी कांदा आंदोलनातूनच राजकारणातून शिरकाव केला.बिहारमधील चंपारण्याचे आंदोलन शेतकऱ्यांना संघटित करून लढा केला खेड तालुका मधील कांदा आंदोलन शेतकऱ्यांचा आत्मविश्वास जागा करण्यास कारण ठरले शेतकरी कष्टकऱ्यांमध्ये गांधीजी विषयी आदरभाव निर्माण झाला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वात अनेक आंदोलन केली. हा विचार सारा देश भर पसरला. उत्तरेकडे चरणसिंग सारखे नेते याच विचारातून प्रेरित झाले. वाढीव सारा, कर्जमुक्ती इत्यादी प्रश्नातून बंगाल, बिहार, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, मद्रास इत्यादी ठिकाणी शेतकऱ्यांचे उठाव होत होते. कोंकणातील भोपल्यांचे बंड खोतीच्या वादातून निर्माण झालेले होते. हिंदू-मुसलमान असा तेढीचा रंग देऊन शेतकऱ्यांचे आंदोलने चिरडली जात होती. फोडा-झोडा नीतीला यश येत होते.

१९४८ च्या दरम्यान महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात आदिवासी वारल्याची चळवळ गोदावरी परुळेकरांनी उभी केली. कम्युनिस्टांच्या या चळवळीने किसान सभेची स्थापना करून जमीनदारा विरुद्ध कुळांचा आवाज उठविला. जमिनीचे फेरवाटप, कुळांना संरक्षण यात क्रांतिसिंह नाना पाटील, दत्ता देशमुख, माधवराव गायकवाड इत्यादी नेते कार्यरत होते. शेतीमालाचा भाव, सावकारी दडपशाही नष्ट करणे, कामगारांची किमान वेतन इत्यादी प्रश्न हाती घेऊन लाल निशाण गटाची स्थापना करून आंदोलन केली.... तसेच राम मनोहर यांच्या समाजवादी गटाने भूमी सेना स्थापन करून महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर जमीन बळकाव आंदोलने केली. चौ खांबी योजना मांडून शेती विकासाबरोरच शेतकऱ्यांच्या उत्थानाची भूमिका मांडली. त्याचबरोबर सत्यशोधकी भूमिका घेऊन विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतकऱ्याचे प्रश्न घेऊन लढे उभी केले, परिषदा भरवून आंदोलने केली. याच दरम्यान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरी तितुका एक ही भूमिका घेऊन मोर्चे काढली, आंदोलन करून कष्टकऱ्यांचे प्रश्न उपस्थित केले... वऱ्हाड आणि विदर्भामध्ये भारत कृषक समाज स्थापन करून डॉक्टर पंजाबराव देशमुख शेतसारा विरोधात भूमिका घेऊन लोक जागर केला. कर्जबाजारीपणा, शेतीमालाचा भाव, शेतमजुरांचे किमान वेतनासाठी आंदोलनं केली.... सत्यशोधक समाजाचा वारसा सांगत ब्राह्मणोत्तर पक्षाच्या नेत्यांनी शेतकरी आणि कामगाराचे प्रश्न हाती घेऊन सरकार विरोधात आंदोलने केली. जेधे बंधू, जवळकर शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, उद्धवराव पाटील इत्यादी मंडळींनी शिका पक्षाची स्थापना करून शेतकरीविरोधी धोरणाला कडाडून विरोध केला.... मध्यंतरी महाराष्ट्रात सर्व विरोधी पक्षांच्या शेतकरी दिंड्यांचा मोर्चा विधानसभेवर नेऊन देशपातळीवरील नेत्यांनी स्वतःला अटक करून घेतली होती.

ऐंशीच्या दशकात शरद जोशींच्या शेतकरी संघटनेने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. ही संघटना केवळ पारंपरिक पद्धतींनी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडत नव्हती, तर संपूर्ण व्यवस्था बदलण्याची भाषा करीत होती. एक स्वतंत्र अशी अधिवेशन पद्धतीची मांडणी करून विचार आणि प्रतिभावान आंदोलने करीत होती. विचार आणि कार्यपद्धती ही नवी मांडणी अनेकांना बुचकळ्यात टाकणारी होती. शेतीमालाच्या उत्पादनखर्चावर आधारी किफायतशीर भाव, भीक नको हवे घामाचे दाम, भारत आणि इंडिया तील संघर्ष रेखा आखून इतिहासागत लुटीची मांडणी सामान्याच्या चटकन लक्षात येत होती. भारतीय समाजाचा इतिहास हा शेतीच्या लूटमारीचा इतिहास आहे. शेतकरी संघटना ही एक स्वतंत्र विचार पद्धती आहे. केवळ काही मागण्यासाठी निर्माण झालेली युनियन नाही. समाज एका दोषास्पद अवस्थेतून दुसऱ्या दोषास्पद अवस्थेत जात असतो, तेव्हा स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणे हाच मार्ग योग्य होय. विचारांनी वस्तुस्थिती बदलत नाही, तर वस्तुस्थिती ने विचार बदलतो. विचारवंत केवळ शब्द देत असतात इत्यादी विचार आणि कार्यपद्धती तून अनेक आंदोलने यशस्वी केली. हा विचार सार्वत्रिक करून एक प्रबळ वातावरण तयार केले....

कांदा आंदोलन, ऊस आंदोलन, तंबाखू आंदोलन, दूध-भात आंदोलन, कापूस आंदोलन, रास्ता रोको, ठिय्या आंदोलन, पान-फुल आंदोलन, चांदवडचे महिला अधिवेशन, आंबेठाण येथील अभ्यास शिबिरे, महिलांच्या मुक्तीची नवी मांडणी (चांदवडची शिदोरी) इत्यादी साऱ्या विचार आंदोलनाचा परिणाम प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मराठी साहित्यावर झाल्याचे लक्षात येते. ७०,८० च्या दशकातील ग्रामीण या विशेषणाने लिहिल्या गेलेल्या साहित्यातून या विचारसरणीचा निश्चित प्रत्यय येतो. आज लिहिल्या जाणाऱ्या कविता, कथा, कादंबऱ्या माझ्या म्हणण्याची निश्चित साक्ष देतील.... या एका विचारसरणीने एक नवा आत्मविश्वास दिला. खेड्यातून, शेतीतून येणाऱ्या नवागताला आपण बोलू शकतो, विचार करू शकतो, आपण आपल्या अनुभवासह प्रकट करू शकतो हा आत्मविश्वास येऊ लागला. नव्वदी- दोन हजार नंतरचे मराठी साहित्य म्हणजे कृषी, साहित्य कृषी जन संस्कृतीचेच साहित्य आहे. बाकी मराठी साहित्य म्हणजे मराठी लिपीत लिहिलेले, उसने आणि आणि भोगवादी

मराठमोळीतीलच साहित्य दिसते.

**६) साहित्य :**

काय म्हणजे साहित्य? ते का आणि कशासाठी निर्माण होते? इत्यादी प्रश्न सामान्य माणसाला आणि जाणत्या माणसालाही पडू शकतात, पडतात. पण अशा प्रश्नांची उत्तरे गणिती पद्धतीने देता येणारी नसतात. साहित्याची तशी व्याख्याही करता येत नाही. असे असूनही ही प्राचीन, आधुनिक अभ्यासक विचारवंतांनी आपापल्यापरीने काही एक व्याख्येच्या स्वरूपातून मांडणी केलेली दिसते. पण तो कधीही ही अंतिम आणि निर्णायक असत नाही. प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या वैशिष्ट्यावर, लक्षणावर कमी-अधिक भर देऊन बोलत असतो. तसेच साहित्य का आणि कशी निर्माण होते? या प्रश्नासंबंधी ही तीच अवस्था असते. का लिहितो? का वाचतो? हे सारे प्रश्न, प्रश्न म्हणूनच उरत असतात. मनोरंजनासाठी, प्रबोधनासाठी, प्रचारासाठी, माहिती आणि ज्ञान प्राप्तीसाठी इत्यादी देता येऊ शकणारे उत्तरे दिली जातात. पण यातून काही गोष्टी आपण जरूर लक्षात घेतल्या पाहिजेत की, साहित्य हे माणसाची असते, माणसासाठी असते. माणुसकी संवर्धन करीत असते. मुख्य व्यवस्थेशी निगडित असते. माणूस पणाच्या मूल्यांची जपणूक, संवर्धन, संरक्षण आणि निर्माण करणे किंवा वेळ प्रसंग जुनाट मूल्यांचा निषेध करणं हे साहित्याचं कर्तव्यच मानलं जातं. स-हितता शिकविते, ते साहित्य म्हणूनच माणसाला साहित्याची फार जरुरी असते. जगण्याचा एक समर्थ आधार असतो. साहित्य म्हणजे जीवन भाष्य असते. जीवनाचा आणि जगण्याचा अन्वयार्थ साहित्य लावीत असते. साहित्य आणि समाजाचे परस्पर संबंधही सांगितली जातात, तर कधी साहित्याचा समाजाशी काय संबंध आहे? असा नकारार्थी सवालही उपस्थित केला जातो काय? ही एक स्वतंत्र आणि स्वायत्त असते. ती केवळ स्वानासुखाय असते. अशी मांडणी केली जाते. संस्कृतीचे संवर्धन, रक्षण आणि पोषण करण्याची जबाबदारी साहित्याचीच असते असे सांगितले जाते. साहित्यिक कलावंत अखेरी एक  माणूसच असतो. समाजाचा, कुटुंबाचा एक जबाबदार घटक असतो. देशाचा एक जबाबदार नागरिक असतो. लौकिक सुखदुःखाचा तोही एक धनी असतो. अवंतीभोवतीच्या घटकांचा परिणाम त्याच्याही मनावर, विचारावर होत असतो. त्याच्याही संवेदना, जाणिवा सजग होतात. भूगोल, इतिहास, भाषा, समाज यासंबंधीच्या घटनात्मक उलथा-पालथीच्या परिणामाचा तोही एक साक्षीदार असते.... पण असे असूनही समकालिनातील वास्तवाचा वेध घेताना त्याचा साहित्य संवाद होईलच असे नाही. कारण दोघांचे दृष्टिकोन भिन्न असू शकतात. विचारसरणी परस्पर विरोधी असू शकतो. यात कुणाला आपल्या परंपरांचा, गतइतीहासाचा अभिमान वाटत असतो. तर कुणाला गतइतिहासाने समाजमनावर अन्याय केल्याची भावना तीव्रपणाने जाणवत असते. महात्मा फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर, फडके, खांडेकर अशी काही वानगी दाखल नावे सांगता येईल. तर कधी समान विचाराने, समान जीवन विषयक दृष्टिकोनाने, पण स्वतंत्र अशा आपल्या शैलीने लेखन करणारे ही असतात. चळवळीच्या साहित्या मध्ये ऊर्जा स्रोतांचा समान धर्म राखून आपले सत्त्व-तत्त्व राखणारे लेखनही होत असते. सांप्रदायिकता किंवा समान विचार धर्म जागविणाऱ्या लेखका मध्ये ही भावना दिसून येते. साठोतर मराठी साहित्याच्या प्रवाहातील विचार संदर्भ बऱ्याचदा समान असल्याचे भावते. तरीही त्यांचे त्यांचे निराळेपण व्यक्तीसापेक्षीच असते ही ध्यानी घेतली पाहिजे.

**- भास्कर चंदनशिव**

♦ ♦ ♦

# शरद जोशी यांची विचारसूत्रे

- शेतकऱ्यांना हवे बाजारपेठ आणि तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य
- सर्व सरकारी देणी आणि कर्जे अनैतिक आणि बेकायदेशीर
- शेती ही जीवनशैली नसून व्यवसाय आहे
- शेतीतच एका दाण्याचे शंभर दाणे होतात, जगाचा इतिहास शेतीच्या लुटीचा इतिहास आहे
- सूटसबसिडीचे नाही काम, भीक नको हवे (१९८०)घामाचे दाम /घेऊ (१९९२) घामाचे दाम
- शेतीची लूट चालूच आहे, फक्त लुटणारे बदलले
- शेतकरी तितुका एक एक
- पाणी असेल त्याची पाण्याने तर नसेल त्याची बिनपाण्याने हजामत होते
- सामूहिक निर्णय चुकतात, व्यक्तिगत निर्णय अचूक असण्याची अधिक शक्यता असते
- लक्ष्मिमुक्ति हे मंगल सावकाराचे देणे आहे
- गोरा इंग्रज जाऊन काळा इंग्रज आला आहे
- या देशात भारत आणि इंडिया असे दोन देश आहेत
- बांडगुळाची छाटणी करावी लागणार आहे

# संमेलनाचे मोठ्या थाटात उद्‌घाटन

अंगारमळा ब्युरो

**अलिबाग येथे सहाव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे मोठ्या थाटात उद्‌घाटन**

सहाव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन खासदार संजय राऊत यांच्या हस्ते मोठ्या थाटात उद्‌घाटन झाले. यावेळी खासदार सुनील तटकरे, एबीपी माझाचे कार्यकारी संपादक राजीव खांडेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक भास्कर चंदनशिव, स्वागताध्यक्ष ॲड. प्रदीप पाटील, संयोजक ॲड. सतीश बोरूळकर, कार्याध्यक्ष गंगाधर मुटे, कुरुळचे सरपंच ॲड. जनार्दन पाटील व उपसरपंच सौ. स्वाती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पिढ्यानपिढ्यांचा अबोलतेला लिहिते बोलते करण्याचा इवलासा प्रयत्न म्हणून सुरू करण्यात आलेला अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचा प्रयोग आता चांगलेच बाळसे धरू लागला आहे. या वर्षी अलिबाग येथे सहाव्या साहित्य संमेलनाचे आयोजन ८ व ९ फेब्रुवारी रोजी अलिबाग–कुरुळ येथील क्षात्रैक्य सभागृहात आयोजित करण्यात आले होते. शेती अर्थ प्रबोधिनी यांच्या वतीने हे संमेलन गेली सहा वर्ष राज्यातल्या विविध भागात भरवले जाते. युगात्मा शरद जोशी यांच्या अध्यक्षते खाली पहिले शेतकरी साहित्य संमेलन वर्धा येथे भरवण्यात आले होते. त्या नतर हे सहावे संमेलन अलिबाग येथे भरवण्यात आले.



दि ८ रोजी अलिबाग शहरातील शिवाजी चौक येथून ग्रंथदिंडी काढण्यात आली. हि दिंडी शहरातील मुख्य मार्गावरून कुरुळ येथे पोहचली. या दिंडीत राज्यभरातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. अलिबाग येथील प्रसिद्ध ढोल ताशा पथकाने आपले विविध कला प्रकार दाखवून नागरिकांना मंत्रमुग्ध केले. महिलांनी या दिंडीत मोठा सहभाग घेतला. ही दिंडी पाहण्यासाठी अलिबागकरांनी मोठी गर्दी केली होती. या दिंडीतील पालखीत शरद जोशी यांचे ग्रंथसाहित्य ठेवण्यात आले होते. स्वागताध्यक्ष ॲड. प्रदीप पाटील व आयोजक ॲड. सतीश बोरुळकर या पालखीचे भोई झाले होते.



ग्रंथ दिंडी नंतर संमेलनाच्या उस्त्राटनांचा कार्य्रक्रम वेळेवर सुरू झाला. सर्व मान्यवर वेळेवर कार्यक्रमस्थळी हजर झाले होते. सर्व सन्माननीय पाहुण्यांना स्वागताध्यक्ष व संयोजक यांनी व्यासपीठावर आणले. सुरुवातीला हरिदास मुंगले, गणेश मुटे, तेजस्वींनी कोपरकर, विवेक मुटे व संचाने स्वागत गीत गाऊन पाहुण्यांचे स्वागत केले.



त्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले व युगात्मा शरद जोशी यांच्या प्रतिमांचे पूजन व दीप प्रज्वलित करून संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. नंतर शेतकरी नमन गीत गाऊन व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष गंगाधर मुटे यांनी केले तर आयोजनामागची भूमिका ॲड. सतीश बोरूळकर यांनी मांडली. स्वागताध्यक्ष ॲड. प्रदीप पाटील यांनी आपल्या स्वागतपर भाषणात सर्व आलेल्या मान्यवरांचे व राज्य भरातून आलेल्या प्रतिनिधींचे स्वागत केले.

सहाव्या संमेलनाचे उद्घाटन सामनाचे संपादक खासदार संजय राऊत यांच्या हस्ते झाले. या वेळी बोलताना संजय राऊत यांनी शेतकरी साहित्य संमेलनाचे कौतुक करून खऱ्या अर्थाने हे साहित्य संमेलन अखिल भारतीय करण्यासाठी पुढील संमेलन राज्याबाहेर भरवण्यासाठी संयोजकांना मदत करण्याचे आश्वासन दिले. शरद जोशी यांच्या सोबत असलेले जिव्हाळ्याचे संबंध सांगत त्यांनी शेतकरी चळवळीशी असलेला ऋणानुबंध व्यक्त केला. राज्य सरकार शेती प्रश्नावर सकारात्मक असल्याचेही त्यांनी या वेळी






सहावे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, अलिबाग - उदघाटन समारंभ

सांगितले.

खासदार सुनील तटकरे यांनी शेती प्रश्नावर सरकारात वेळोवेळी पाठपुरावा करणार असल्याचे स्पष्ट केले तर एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर यांनी माध्यमातून शेती प्रश्न ऐरणीवर आणण्याचे काम सुरूच असल्याचे सांगितले.



साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. भास्कर चंदनशिव यांनी आपल्या विस्तृत अध्यक्षीय भाषणात शेती व साहित्य या संबंधाने विस्तृत मांडणी केली. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सुधीर बिंदू यांनी केले.

♦ ♦ ♦



।। श्री संत सखुआई प्रसन्न।।

फोन नं. २६१२१६
मो. ९८६०५७३१८२

# भूषण कृषी केंद्र

मेन रोड, बाजार चौक, (सिंदी रेल्वे),
ता. सेलु, जि. वर्धा

***आमचे येथे सर्व प्रकारची रासायनिक खते, किटकनाशके व बि-बियाणे मिळेल.***

**प्रोप्रा. सुरेशभाऊ लेंडे**

फोन नं. (ऑ.) २६६२६३
(नि.) २६६२६४

# मे. किर्ती मशिनरी

सिंदी रेल्वे, ता. सेलू, जि. वर्धा

**प्रो. निळकंठराव घवघवे**



**वितरक :**

- कोरोमंडल इंटरनॅशनल लि.
- सल्फर मिल्स, मुंबई
- भारत इन्सेक्टीसाईड, दिल्ली
- तुलशी सिडस् लि., गुंटूर
- सेन्ट्रोमेअर बॉयो सोल्यूशन, हैद्राबाद
- दफ्तरी सिडस्, सेलू
- PHG इंडस्ट्रीयल इंस्टिट्यूट, कोईमतूर
- प्लुगा पम्प्स अॅन्ड मोटर्स, बडोदा
- रॉकेट इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन प्रा.लि., कोल्हापूर
- पारस इरिगेशन लि. अहमदनगर



।। श्री बालाजी प्रसन्न।।
।। श्री सिद्धेश्वर प्रसन्न।।

फोन : ०२३८२-२४७५२९
मो. ९४२२६५७५२९

**अशोक विजयकुमार पाटील**
**(नागेशवाडीकर)**

# मे. उषा ट्रेडींग कंपनी

कमीशन एजंट
आडत दुकान, ४९-अ, मार्केट यार्ड, लातूर-४१३५१२



*Baba Ghavghave*
Mob. 9860363160
7798309043

**Venketesh Krishi & Machinery**
Bazar Chowk, Sindhi Railway, Dist. Wardha



**श्री. बालाप्रसाद बन्सीलाल बिदादा**
संचालक, उ.कृ.उ.बाजार समिती, लातूर



**श्री संजय कलोडे**
सिंदी रेल्वे जि. वर्धा

# साहित्य संमेलन नव्हे, प्रशिक्षणार्थी शिबिर

रवींद्र दळवी



जेव्हा एखाद्या विषयाची माहिती करून घ्यावयाची असते तेव्हा आपल्याकडे एक पर्याय असतो तो म्हणजे त्या विषयाची ज्याला माहिती आहे अश्या व्यक्तीशी संपर्क साधून माहिती करून घेणे. त्या विषयावर चर्चा करून किंवा संबंधीत विषयाची पुस्तके वाचून आपण तेवढ्यापुरती भूक भागवू शकतो परंतू या प्रकाराला एक मर्यादा असते. जसे सांगणारा हातचे राखूनही सांगू शकतो किंवा ऐकणारा कसा आहे त्यावरही संवादाची फलश्रृती अवलंबून असते. पुस्तकाचे म्हणालं तर विषयाचा अवाका, लेखक किंवा लिहिलेले सर्वच काही समजणे हे ही व्यक्तिसापेक्ष असते, पुन्हा पुस्तकाची भाषा, विषयाची मांडणी याही मर्यादा आहेतच. जेव्हा तो विषय समजून घेऊन त्यावर परिणामकारक प्रत्यक्ष काम करायचे असते तेव्हा मात्र त्या विषयाच्या सर्वच पैलूवर प्रकाश पडणेही क्रमप्राप्त असते. अश्या वेळी ती गरज पूर्ण करण्याकरिता प्रशिक्षणाची आवश्यकता असते. अशा प्रकारचे प्रशिक्षण साधारणता एखाद्या बंद खोलीत काही समविचारी जिज्ञासू सहकाऱ्यासमवेत संबंधित विषयाच्या तज्ज्ञांद्वारे दिल्या-घेतल्या जात असते. परंतू जर विषयच लाखो करोडो जीवांच्या जगण्या-मरण्यासारखा संवेदनशील असेल, विषयाच्या आनुषंगिक काही ठोस निर्णायक भूमिका घेणे निकडीचे असेल, किंबहुना ती काळाची, समाजाची गरज असेल तर त्यावेळी विषयाशी संबंधित असंख्य कंगोऱ्याचा उहापोह जोपर्यंत जाणिवे-नेणीवेच्या पातळीवर होत नाही, तो पर्यंत त्या विषयाशी आपण खऱ्या अर्थाने भिडूच शकत नाही. अश्या वेळी मात्र अभ्यास, चिंतन, मननाकरिता प्रशिक्षणार्थ्यांना मानसिकदृष्ट्या तयार असणे किंवा करणे अत्यंत आवश्यक असते. मानसिक दृष्ट्या तयार होणेकारिता सर्वप्रथम आपल्या मेंदूतील संबंधित विषयाच्या अनुषंगाने असलेल्या काही जुन्या बाबी समजुती-गैरसमजुती बाजूला सारून वस्तुनिष्ठपणे तर्कावर आधारीत विचार समजून घेऊन आकलनाकरिता मेंदूत नवीन जागा करून निर्माण करून देणे अत्यंत आवश्यक असते. असे मानसिकरीत्या तयार होण्याकरीत गरज असते आल्हाददायक वातावरणाची. निसर्गाचा सहवास मनुष्याला नेहमीच प्रेरित करीत देत असतो. अश्याच प्रकारची तंद्री शेतात काम करताना लागत असते. जसे निंदन सुरू असताना आपली नजर प्रत्येक गवतावर, तनावर असते, चुकूनही हातून कोवळे पीक कापल्या जात नाहीच कारण मन एकाग्र झालेले असल्याने नजर असते फक्त तनकटाच्या नाशावर. हीच अस्वस्था पेरणी, फवारणी अश्या प्रकारची कित्येक आनुषंगिक कामे करताना होत असते. याचे एकमेव कारण म्हणजे ते वावर, ते पिकं, झाडं झुडूप, काळी माती आणि सभोवार पसरलेला निसर्ग. अलिबाग येथे पार पडलेले सहावे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन मला एखाद्या निवासी प्रशिक्षण शिबिरासारखेच वाटले.

दि. ७ फेब्रुवारीच्या सकाळपासूनच महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून प्रतिनिधी संमेलन स्थळी हजर होत होते. मी प्रथम रेल्वे, बोट आणि बस असा आगळा वेगळा प्रवास करीत दुपारी २ वाजताच्या सुमारास माझ्या परिवारासह अलिबाग येथील शिवाजी चौकात पोहचलो. आजूबाजूला नजर टाकतो तर काय अगदी चौकाच्या दर्शनी भागात संमेलनाचे फ्लेक्स झळकत होते. रिक्शाचालकाला विचारले तर लगेच म्हणाला चला.. म्हणजे संमेलनाची प्रसिद्धी झालेली होतीच आणि स्थानिक जनतेत संमेलनाची उत्सुकताही प्रवासात रिक्शा चालकाशी बोलताना जाणवली. पुढच्या दहा मिनिटातच संमेलन स्थळी पोहचताच





समोर प्रशस्त सभागृह, आजूबाजूला मोकळे मैदान सभोवार हिरवागार निसर्ग आणि फ्लेक्सच्या स्वरूपात गत पाचही संमेलनाचा चित्रमय वृत्तांत मला गत स्मृतीत घेऊन गेला. वातावरणात छान पैकी हवाहवासा गारवा असल्याने अतिशय उल्हाशीत झाल्याचे माझ्यासकट इतरही प्रतिनिधींच्या चेहऱ्यावर जाणवत होते. हळूहळू प्रतिनिधी येत होते, ज्यात महिलांच्या लक्षणीय सहभागासह तरुणांचाही तेवढाच प्रतिसाद होता. एव्हाना एकमेकाची आस्थेनं विचारपूस सूरु झालेली. वातावरण प्रसन्न होतच राहिले. अगदी रात्रीच्या भोजनापर्यंत. सर्व मिळून एकत्रित भोजन असल्याने एकमेकाला आग्रहाने वाढत होते. एक विशेष बाब म्हणजे कुणालाही आरामाकरिता वेगळी स्वतंत्र अशी व्यवस्था नव्हती. दोन हॉल मध्ये महिलांकरिता सभागृहाच्या पहिल्या मजल्यावरील प्रशस्त हॉल आणि पुरुषांकरिता प्रत्यक्ष कार्यक्रम ज्या व्यासपीठावर नियोजित होता, त्या मंचालगतची मोकळी ऐसपैस जागा. भोजनानंतर कुठल्याही सूचनेविना आपापली गादी अंथरून जो तो स्वयंप्रेरणेने झोपायची व्यवस्था करीत होता. असे एकत्र आल्याने विषय रंगत होते. कुणी गत पाच संमेलनाच्या आठवणी जागवत होते तर कुणी दोन दिवसाच्या विविध सत्र, वक्ते, प्रमुख पाहुणे, अध्यक्ष या बद्दल एकमेकाशी हितगुज साधत होते. तर कुणी आजूबाजूच्या निसर्गस्थळा बद्दल चर्चा करीत होते. अश्या मंतरलेल्या वातावरणात आपसूकच एक आपलेपणाची जाणीव मनाला भावत होती.

सभागृहाच्या आतील बाजूस प्रासंगिक अश्या शेती विषयावरील अनेक मान्यवर साहित्यिकाच्या शेर वजा ओळी फ्लेक्स वर झळकत होत्या. पडल्यापडल्या वाचन सुरू होते, सोबतच सदरील शेराचा अर्थ, आशय, कवीबाबत चर्चाही रंगत होती. उदा. नागपूरचे प्रसिद्ध गझलकार अझीझखान पठाण यांच्या मनाला अस्वस्थ करणाऱ्या दोन ओळी......

**शेत हतबल मज म्हणाले आर्जवाने!**
**कासरे लपवून ठेवा पेरल्यावर**

पुढील दोन दिवसाच्या वातावरणाची निर्मिती ह्या फ्लेक्स वरील शेरांनी केलेलीच होती. असं सर्व सुरू असताना संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. गंगाधरजी मुटे, संयोजक ॲड सतीश बोरूळकर यांचे समवेत प्रत्येक प्रतिनिधींना ग्रंथदिंडीच्या नियोजना बाबतीत सांगताना सकाळी ७ वाजता सर्वांनी तयार राहावे, अश्या प्रकारची सूचना करीत होते. दुसरे दिवशी पहाटे पाच वाजताच आख्खं सभागृह जाग होऊन तयारीला लागलेलं पाहून मला आश्चर्य वाटलं. मी वर नमूद केल्या प्रमाणे विशेष बाब म्हणजे कुणालाही



स्थापना : २६/०८/१९३३

# कृषी उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

ता. हिंगोली-४३१५१३, जि. हिंगोली
E-mail : am_hingoli@msamb.com, apmchingoli@gmail.com



महासेन उर्फ मारोती शंकर प्रधान
सचिव
(मो. ९८८१३१५६२५)



शंकरराव बाबाराव पाटील
उपसभापती
(मो. ९७६५७३३४६५)



हरीशचंद्र रामप्रसाद शिंदे
सभापती
(मो. ९८५०७७५१२५)

Phone No 020-64102818
।।श्रीगुरु प्रसन्न।।
With Best Compliments
।।श्रीमदूर्जित सेवा केंद्र।।
Mrs .Prdnya Jayant Bapat & Mrs.Padmaja Umakant Patil
आळंदीत आल्यावर शुद्ध , योग्य मापाच्या व जकातमुक्त स्वस्त ईंधनाचा आवश्य लाभ घ्या .
आळंदी देहू रस्ता साधकाश्रमासमोर
आळंदी देवाची जिल्हा पुणे ४१२१०५





Sahyadri farms
Seeding goodness


एकदा अवश्य भेट द्या.



प्रक्रिया उत्पादने



फळे आणि भाजीपाला



शेतकऱ्यांनी, शेतकऱ्यांसाठी चालवलेली शेतकरी उत्पादक कंपनी



सह्याद्री रिटेल स्टोर



उच्चप्रतीचे खते, कीटकनाशक आणि यंत्रसामग्री

डिस्ट्रिब्युटर बनण्यासाठी संपर्क करा
मो. 7030947040
खते, कीटकनाशक आणि यंत्रसामग्री साठी संपर्क करा
मो. 7030950081 / 7030943455

सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक, महाराष्ट्र.
www.sahyadrifarms.com • /SahyadriFarms | Toll Free : 1800212002020

# पिकांच्या भरघोस उत्पादनासाठी

३० वर्षापासून लाखो शेतकऱ्यांचे विश्वासपात्र

## प्लॅन्टो कृषीतंत्र

भारत सरकारच्या CSIR/NIO प्रयोग शाळेने विकसित केलेल्या तंत्रज्ञानावर आधारित

---

भारतातील विविध कृषी विद्यापिठांमध्ये निरनिराळ्या पिंकावरील परिक्षणात उत्पादन वाढिसाठी प्लॅन्टो उत्पादने खुपच परिणाम कारक असल्याचे सिध्द झाले आहे.




## प्लॅन्टोकृषी तंत्र वापराचे फायदे

मुळ्यांचा जलद विस्तार होतो, अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. फोटोसिंथेसिस क्रियेचा वेग वाढून पिकाची सर्वांगीण व निरोगी वाढ होते. कृषी विद्यापिठातील चाचण्यांनुसार प्लॅन्टोच्या वापराने उत्पादनात २० ते ६०% पर्यंत वाढ मिळते.

An ISO 9001 : 2008 Certified Company

**प्रलशर बायो प्रॉडक्टस प्रा. लि., गोवा**

डी, २/१०, काकोडा इंडस्ट्रियल इस्टेट, कुचेर्रेम, काकोडा, गोवा. । महाराष्ट्र : संपर्क :– ☎ ०९४२२२१०७७५

Krivic-@ 2020

Ph.No. (07152) 245197
Mob.No. 9404042877





Rameshbhai Bisani

BISANI TRADING CO.

E-mail : bisanitradingcompany14@gmail.com

3, Maheswari Market, Opp. Police Station, Wardha-442001

दि यवतमाळ अर्बन
को-ऑप. बँक लि., यवतमाळ
THE YAVATMAL URBAN
CO-OP. BANK LTD., YAVATMAL
॥ साहसे श्री : प्रतिवसति ॥
Regd.No.YML/BNK/114
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - Phone : 07232 - 244241, 243703, 237442
E-mail : ho_adm@yavatmalurbanbank.com - Website : www.yavatmalurbanbank.com

रु.४००० कोटींचा
व्यवसाय करणारी विदर्भ-मराठवाड्यातील
अग्रगण्य सहकारी बँक





जलद सोने तारण कर्ज *
लघु व्यवसाय विकास योजना *
सोलर उपकरण कर्ज *
त्वरित वाहन कर्ज *
डॉक्टर्स व चार्टर्ड अकाउंटंट्स *
कर्ज सुविधा उपलब्ध *
WCTL / LRD / EDUCATION
व्यापारी कर्जाचे अत्यंत माफक व्याज दर*
HYP/CC
11% ते 14%

करासंबंधी सर्व ऑनलाईन चालान भरण्याची सुविधा उपलब्ध.

श्रीकांत देशपांडे — मुख्य कार्यकारी अधिकारी | आशिष उत्तरवार — उपाध्यक्ष | अजय मुंधडा — अध्यक्ष

संचालक - श्री.म.प्र.देव, श्री.सु.य.सरनाईक, श्री.सं.बा.पालतेवार, श्री.चं.बा.रानडे, श्री.प्र.अ.माधमशेट्टीवार, डॉ.श्री.नि.तु.खर्चे
श्री.सं.चिं.डेहनकर, श्री.गो.द.राठोड, श्री.प्र.म.धुर्वे, ॲड.श्री.प्र.ल.चौहान, श्री.सु.शि.कदम, श्रीमती मिरा रा.घाटे
श्रीमती वैदेही रा.नायगांवकर, श्री.वि.क.बरलोटा (सी.ए.), श्री.सं.रा.चिवरकर, श्री.अ.शं.नाईक (कर्म.प्रति.), श्री.म.श.गंजीवाले (कर्म.प्रति.)

६ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



**किसान ट्रेडींग कंपनी**
सिंदी रेल्वे

६ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



**श्री. इंदरचंदजी बैद**
खैरी, जि.यवतमाळ

६ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



**श्री सुभाष बोकडे**
कुरझरी, जि. वर्धा

६ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



**श्री मुकुंद खोडे**
सेलडोह



६ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!

**श्री रविंद्र खोडे**
सेलडोह, जि. वर्धा









आरामाकरिता वेगळी स्वतंत्र अशी व्यवस्था नव्हती, ती सामाईक होती ते यामुळेच. इथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते कि, पैठण येथील पाचव्या संमेलनात प्रतिनिधीकरिता स्वतंत्र खोलीची व्यवस्था केलेली होती. मी स्वत: ग्रंथ दिंडीत उशीरा पोहचलो होतो. इथे मात्र चहा नाश्ता घेऊन आम्ही सर्व प्रतिनिधी ग्रंथदिंडीकरिता अलिबाग मधील शिवाजी चौकात हजर सकाळी ९ वाजता हजर होतो. वेळेच भान, शिस्त यातून जाणवत होती. स्थानिक कलाकारांच्या ढोल पथकासह अतिशय शिस्तबद्धपणे शिवाजी चौकातून ग्रंथदिंडी नियोजित संमेलन स्थळी वेळेतच पोहचली होती. प्रत्यक्ष संमेलनाचे उद्घाटन सत्र अगदी नियोजित वेळेत सुरू झाले. संमेलनाचे स्वागताध्यक्ष ॲड प्रदीप पाटील यांनी आपल्या ओघवत्या शैलीत उपस्थितांचे स्वागत करीत संमेलनाचा आस्वाद घ्यावा, कुठलीही अडचण आल्यास तसे सांगावे, अशी आपुलकीची भावना व्यक्त केल्याने आपसूकच जिव्हाळ्याचे वातावरण निर्माण झाले. संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. गंगाधर मुटे यांनी आपल्या बीजभाषणातून संमेलनाचा उद्देश–भूमिका स्पष्ट करताना अतिशय मौलिक असे वक्तव्य केले की बोललेले हवेत विरून जात असते परंतू लिहिलेलं चिरंतन राहून ते अनेक पिढ्यांना दिशादर्शक ठरत असते असे सांगताना संत तुकाराम, महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासह युगात्मा शरद जोशी, इंद्रजीत भालेराव, विठ्ठल वाघ अश्या अनेक साहित्यिकांनी निर्माण केलेले अस्सल शेतीमातीचे साहित्य आजही आपल्याला प्रेरणादायी ठरत आहे आणि हे केवळ लिहिल्यामुळे शक्य झाले. तेव्हा जास्तीत जास्त वास्तवाशी भिडून शेतीमातीच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे आवाहन केले. संमेलनाचे संयोजक ॲड सतीश बोरूळकर यांनी कोंकण परिसराचा परिचय करून देतानी कोंकणाचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, भौगोलिक दस्तऐवज काव्यमय स्वरूपात उलगडताना अलिबाग या ठिकाणी संमेलन आयोजनामागे असलेली भूमिका सांगतांना स्पष्ट केले की आपण सर्वांनी यावे, कोंकणाचा हिरवागार निसर्ग बघावा आणि हे हिरवेपण आपल्या लेखणीत उतरावे.

संमेलनाचे उदघाटक आणि प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित





असलेले मा. खासदार संजय राऊत व मा. खासदार सुनील तटकरे हे दोन्ही कोंकणचे पुत्र असल्याने आपल्या भागात संमेलन होत असल्याचा मनस्वी आनंद होत असल्याची भावना आपल्या भाषणातून व्यक्त केली. आपल्या उद्घाटकीय भाषणातून युगात्मा शरद जोशी यांच्या स्मृतींना उजाळा देताना खासदार संजय राऊत यांनी युगात्मा शरद जोशी या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू अतिशय भावुकपणे उपस्थितासमोर मांडून शेतीप्रश्नाविषयी आजचे सरकार सकारात्मक पावले उचलत असल्याची विशेषत्वाने ग्वाही देऊन हे शेतकरी संमेलन आता अखिल भारतील साहित्य संमेलनाच्या धर्तीवर राज्याच्या सीमारेषा ओलांडून जायला पाहिजे, असा प्रेरणादायी सल्लाही दिला. आ. खासदार सुनील तटकरे यांनीही आपल्या मनोगतातून शेतीप्रश्नाचा शासकीय पातळीवरून आम्ही पाठपुरावा करण्यास कटिबद्ध असल्याचे सूतोवाच केले. एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांनी आपल्या मनोगतातून संमेलनाचे कौतुक करत प्रसार माध्यमातून शेतीप्रश्न ऐरणीवर आणण्याकरिता संपूर्णपणे मदत करण्याची ग्वाही दिली. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून आ. भास्कर चंदनशिव यांनी शेतीसाहित्य कृषीसंस्कृती अत्यंत व्यापक आढावा घेऊन उपस्थितांना अंतर्मुख केले. अध्यक्षीय भाषण म्हणजे आमच्या सारख्या नवागतासाठी पर्वणीच होती.

उद्घाटन सत्र गाजले ते संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री.गंगाधर मुटे यांच्या कवीमनाच्या अतिशय उद्विग्न अवस्थेतून आलेल्या या ओळी....

**कुणी तरी यांची आता, पडजीभ उपटली पाहिजे**
**नाटकी बोलतात साले, की गरिबी हटली पाहिजे**

**संपूर्ण सातबारा कोरा करू म्हणाले,**
**भूललेत भाडखाऊ दिल्लीत पोचल्याने**

हे दोन्ही शेर अनुक्रमे खासदार संजय राऊत आणि खासदार सुनील तटकरे यांनी वाचून दाखवत शेरातील आशय किती यथार्थ आहे याची कबुलीही एकमेकाकडे पाहत आपल्या खुसखुशीत शैलीतून उपस्थितासमोर दिली. संमेलनाच्या प्रथेप्रमाणे काही ठराव मांडले जातात आणि ते शासन दरबारी ठोस कार्यवाही करिता सादर केले जातात. यातून शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी ही अपेक्षाही असते. परंतू उघाटन सत्रातच या दोन्ही खासदार द्वयींनीं शेतीप्रश्नाशी असलेली बांधिलकी स्पष्ट केल्याने उद्घाटन सत्राला एका उंचीवर नेऊन ठेवले, ही संमेलन आयोजनाच्या दृष्टीने श्रम साफल्याची पावतीच होती.

पुन्हा दुपारचे सामूहिक जेवण, दुपारच्या सत्रात अतिशय शिस्तबद्धपणे दोन सत्रात पार पडलेले शेतकरी काव्य संमेलन, सूत्रसंचालक कवी गझलकार मित्र अनंत नांदूरकर, नागपूर यांच्या अभ्यासपूर्ण आणि प्रासंगिक निवेदनातून बहरत गेले.

परिसंवाद आणि रात्री कोंकण किनार संगीत रजनी हा अतिशय सुश्राव्य असा भावविभोर करणारा शब्दसुरांचा आविष्कार अनुभवायला मिळाला. रात्री पुन्हा दिवसभरातील कार्यक्रमावर सामूहिक चर्चा.

संमेलनाचे दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत यांनी घेतलेली ज्येष्ठ साहित्यिक प्रा. शेषराव मोहिते यांची मुलाखत ज्यातून उलगडत गेलेले मोहिते सर. एक निष्ठावंत कार्यकर्ता ते साहित्यिक असा विलक्षण प्रवास बौद्धिक देऊन गेला.

विशेष बाब म्हणजे संमेलनात नव्यानेच कथाकथन या विषयाचा केलेला समावेश. ज्येष्ठ साहित्यिक डॉ भास्कर बढे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेले कथाकथन, ज्यात तीनही कथाकथनकार हे प्रथमच आपली कथा सादर करणार होते. अश्या प्रकारे नव्याने लिहू पाहणाऱ्या हातांना एखाद्या विषयाच्या अनुषंगाने मोठ्या व्यासपीठावर संधी देणे निश्चितच प्रेरणादायी होते. कथाकारासाठी आणि आमच्या सारख्या नवागतासाठीही.

संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे शेतकरी गझल मुशायरा, ज्यात ज्येष्ठ गझलकार आ. मसूद पटेल सरांसमवेत सर्वच गझलकारांचे सादरीकरण आणि मुशायऱ्याचे संचालन करणाऱ्या राधिका प्रेम संस्कार, रायगड यांनी प्रत्येक गझलकारांच्या रचनेवर समर्पक भाष्य करून यथोचित न्याय देत केलेल्या प्रभावी निवेदनाला उपस्थितांनी दिलेली उत्स्फूर्त दाद. यामुळे गझल मुशायरा

अविस्मरणीय झाला.

शेती साहित्याशी निगडित सर्वच साहित्यप्रकाराचे सादरीकरण, उजळणी, संघटन कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, लेखन कौशल्य आत्मसात करणे, सांघिक कार्यकुशलता, सामूहिक चर्चा, संवादाचे महत्त्व, स्वानुभवकथन, वेळेचे नियोजन, प्रत्येक सत्राची नियोजनबद्धपणे आखणी आणि ते वेळेत पार पाडण्याकरिता प्रत्यक्ष अंमलबजावणी. अश्या एखाद्या प्रशिक्षण शिबिरात ज्या प्रमाणे ह्या सर्व बाबीचा अंतर्भाव असतो तश्या प्रकारे मला हे संमेलन एखाद्या निवासी प्रशिक्षण शिबिरासारखे वाटले......!

– रवींद्र अंबादास दळवी
नाशिक, मो. ९४२३६२२६१५

**पावसा बघ फास मी घेणार नाही**
**तू सरींचे दोर खाली सोडल्यावर**

**– अझीझखान पठाण**

*****

**चाकू – सुऱ्या प्रमाणे, हातात पेन त्यांच्या**
**जितके लुटायचे ते, लुटतात कायद्याने**

**– गंगाधर मुटे ''अभय**

*****

**हिर्व लेनं अभायाचं लेऊ दे रे धरतिले**
**कोनी तरसाले नोको कोरभर भाकरीले**

**झांबलून झाले कवाचं पोथीपुरान सारे**
**शेंदरातल्या गोट्याचे सारे खोटेचं रे वारे**
**खरी गोठ कास्तकाराची नाई कोनी सांगाले**

**– रवींद्र दळवी, नाशिक**

*****

**शेतात माझ्या थोडा तरी या पैशाचा पाऊस पाडा**
**असतो करत मी वाजिब दराच्या दुष्काळी पट्ट्यात शेती**

**डॉ. रविपाल भारशंकर, हिंगणघाट**

*****

**भाकरीचा प्रश्न माझ्या रोजचा अन्**
**रोज त्यांना भाकरी पुरवायचो मी**

**– मुक्तविहारी**

*****

**पोसत आली उभ्या जगाला शेती माझी,**
**मी कोणाच्या तुकड्यांवरती जगलो नाही!**

**रमेश बुरबुरे, यवतमाळ**

*****




अक्षांशस्वर, दिव्यदृष्टी कलाकार, मुंबई प्रस्तुत कोकण किनार संगीत रजनी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्था मर्या. धनोडी, र.न. ५४०

कार्यक्षेत्र : वरूड तालुका

'राजगृह' मुलताई रोड, आर.टी.ओ. चौक, वरूड, जि. अमरावती. दुरध्वनी : (०७२२९) २३४०९९

| **श्री. एस.एस. लोणारे** | **श्री. एस.एस. डबरासे** | **श्री. एन.टी. बारसागडे** |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | कार्यलक्षी संचालक |

**संचालक :**
१) श्री. वासुदेव जयरामजी लांडगे
२) श्री. हरिदास तुकारामजी गणविर
३) श्री. नालकदास विभाजी लोणारे
४) श्री. उद्धवराव गणपतराव पाटील
५) श्री. हरिश्चंद्र जंगलूजी नागदेवे
६) श्री. भिमराव हिरामनजी हरले
७) श्री. दिलीप लक्ष्मणरावजी भोयर
८) श्री. गणेश शालीकरामजी मेओलीया
९) सौ. बेबीताई पंजाबरावजी पवार
१०) सौ. मायाताई सुखदेवरावजी पाटील
११) श्री. प्रकाश महादेवरावजी कासोरदे

**कर्मचारी वर्ग :** श्री. डी.एम. देडाळे, श्री. व्ही.डी. भगत, श्री. आर.बी. हरले, श्री. आर.एस. देडाळे, श्री. डी.एम. पाटील, श्री. आर.एस. डोंगरे

**विधी सल्लागार :** ॲड. एस.एन. कांबळे, ॲड. एच.डब्ल्यू. लांडगे

# कृषी उत्पन्न बाजार समिती, औसा

ता. औसा, जिल्हा लातूर, फोन : ०२३८३-२२२०६३ Email : am_ausa@msamb.com

**स्थापना : १२-१०-१९८२**



**श्री. मधुकर गोविंदराव गुंजकर**
प्रशासक

**मुस्ताक अहमद शेख**
सचिव

- मुख्य बाजारपेठ औसा उप बाजारपेठ किल्लारी व उप बाजार उजनी

**वैशिष्ट्ये**

- औसा येथे स्वतंत्र्य सुसज्य मार्केट यार्ड.
- १००% इलेक्ट्रॉनिक्स वजन काट्याचा वापर असलेली जिल्ह्यातील एकमेव बाजारपेठ.
- दर गुरुवारी आठवडी गुरांचा जंगी बाजार.
- प्रत्येक आडतीवर दररोज व स्वतंत्र सौदा काढणारी एकमेव बाजार समिती.
- स्टिकर बोर्डद्वारे आसपासच्या बाजारातील दैनिक बाजार भाव सुविधा.
- शेतकऱ्यांच्या शेतमालाचे लिलावानंतर त्वरीत वजन व विक्रीची रक्कम त्याच दिवशी शेतकऱ्यांना दिली जाते.
- ग्रामीण भागात जनावरांसाठी मोफत पाण्याचे हौद वितरण कार्यक्रम.

**शेतकऱ्यांना नम्र आवाहन**

- शेतीमाल यार्डात आणताना तो स्वच्छ करून आणावा.
- योग्य किंमत येण्यासाठी बाजार भावाचे चढउतार लक्षात घ्यावे व माल सौद्यात विक्री करावा.
- वजन भाव या संदर्भातील म्हणणे समितीस कळवावे.
- शेतकरी बांधवांना नम्र विनंती की, आपला सर्व शेतीमाल आपली हक्काची बाजारपेठ म्हणुन औसा मार्केट यार्डातच विक्रीस आणावा.

**सर्व कर्मचारी वृंद कृषी उत्पन्न बाजार समिती, औसा. जि. लातूर**

# आठोनीतलं साहित्य संमेलन (वऱ्हाडी बोली- लेख)

**सु.पुं. अढाऊकर**



**मनोगत**

आता पर्यंत पाच शेतकरी साहित्य संमेलन लयच जबाबदारी अन् काटेकोरपणे कवी, गझलकार, लेखक, स्तंभ लेखक अन् हाळाचे कास्तकार गंगाधरजी मुटे ययनं आयोजक म्हणूनसन्या लयच साजरे थाटामाटात पार पाळले. अन् सहावं अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलन समिंदराच्या पोटात म्हनजेचं अलिबाग, रायगड इथं तेयनं घेतलं. विदर्भातले लोकं म्हनतात.. 'घर पाह्य बांधून – अन् लगन पाह्य करून.' मी त आता साहित्य संमेलनं पाहूनसन्या अस् म्हनन की; ' घर पाह्य बांधून अन् साहित्य संमेलन पाह्य घेवून. ' लय ताकद, पैसा, मनुष्यबळ लागते राजेहो.... एक ते दिळ मयन्या पासून धावपय , बॅनर, पतरीका, अध्यक्षीय भाषन छापा, सन्मानपतरं, सन्मानचिन्ह, नारयं, फुलं, हारं, तुरे, शाली, मांडव, खुरच्या, गाद्या, चादरी, ग्रंथ दिंडी, शाळेचे लेकरं, फटू, समई, चा, पानी, जेवनं–खावनं, मोठ्या साहित्यिक लोकायले आना, सोळा, तेयची राहाची खाची – प्याची सोय हे सारच करा लागते. पन हे सारं अवघ सहज, लिलया आपल्या घामानं , कष्टानं, मेहनतीनं गंगाधरजी मुटे हाताळतात.

मी अन् माह्ये आकोल्याचे कवी मैतर संदीप भौ देशमुख आम्ही दोघही ह्या साहित्य संमेलनाले गेलो. मुंबई वरून थेट अलिबाग गाठलं. बस ईस्टॅन्ड, कुलाबा बीच, चौकाचौकात जागोजागी शेतकरी साहित्य संमेलनाचे अथिसा बॅनर दिसले. मंग तथूनसन्या क्षात्रौक्य हॉलच्या फाटका जौळ आम्ही आलो. भलीमोठी संमेलनाची कमानं गेट जौळ दिसली. लयच हरिक झाला. गेटच्या अंदरे आम्ही दोघानं पावलं टाकली. आंधी झालेल्या साहित्य संमेलनाचे जोरदार फटू बॅनर रूपात मस्त ऊन्हात झयकत चमचम करत होते. मंग नाव नोंदनी करून एक किट देन्यात आली. त्यात परमानपतरासह सारंच होतं... सारंच म्हनजे पतरीका, पेन, आयडी कार्ड, मा. अध्यक्ष महोदयाचं भाषन, जेवाचे अन् च्याचे कूपनं...आयोजन पाहूनसन्या लय हरिक झाला. मांडवात पाय ठुयला...जरा आम्हाले याले जरा ऊशिरच झाला होता. मा.अध्यक्ष महोदयाचं भाषन चाललं होतं. सभामांडवात म्या पाह्यलं...लयच अभायभर हरिक झाला. पांढ्या शिप्पट् टोप्या घातलेले कास्तकार , कवी, लेखक, साहित्यिक, रसीक, अलिबागकरायनं मांडव कचाकच अन् गचागच भरलेला होता. सारे लोकं भाषनं एकचितानं आयकत होते.

नैसर्गिक वर भेटलेलं अलिबाग लयच खास सर्वांग सुंदर असा स्वर्गच हायं. तीथुल्ले समिंदराचे काठ एकदम स्वच्छ ...ना. काळी कचरा, ना प्लास्टिकच्या पन्न्या, ना गुटक्याच्या पुळ्या ...समिंदराच्या किनाऱ्यावर घोळे, ऊट, बग्ग्या लायन्या मोटारी हायेत. कुलाबा किल्ला , जौळच जंजीरा किल्ला हाय .... कुलाबा बीच, वर्सोली बीच, अलिबाग बीच, अक्षई बीच, किहीम बीच, नागाओ बीच, मांडवा बीच....मले त अस वाटे दुसरं गोवा म्हनजे अलिबागच ....

जसं वऱ्हाड प्रांतातले लोकं साध्याभोळ्या मानसाले वाळेगांव वरून आला काय बे! असं म्हनतात तसेच बंबईचे लोकं बंबईत साध्याभोळ्या मानसाले .. अलिबाग से आया क्या..! अस म्हनतात. तर असे लयच साजरे, साधेभोळे, मनमिळावू, प्रेमळ, जीवाले जीव लावनारे लोकं तथिसा हायेत.

तथुल्ली गुपचूप पाणीपुरी तं यादगार अशी हायं...तांदूयाची पांडीभक भाकरं अन् मस्त रस्सेदार भाजी...लाजवाब खाद्यसंस्कृती....मस्त नारयाचे झाळं, थंन्डीगार हवा, जिकडे तिकडे हिरवाई, मासोयाचा व्यापार जौवळच पेन...पेन म्हनजे लिवाचा नाही. पेन नावाचं गाव. अतिसा सुबक, सुंदर, रेखीव, देखन्या गनपतीच्या मुरत्या घळवल्या जातात. अन अवघ्या भारतात मुरत्या जातात.

साहित्य संमेलन अटपलं. मी अन् माह्या मैतर संदीप देशमुख अलिबाग पासूनं लाल डब्यात बसूनं दूर चाललो होतो. पन अलिबाग अन सहावे अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलन एक अनामिक गोळ घळीची आठोनं कायजात ठेवूनं गेलं....आठवनं ठेवून गेलं.



**– सु. पुं. अढाऊकर**
**मुंबई**




र.नं. २/३५७ | स्था.दि. २०.६.१९५६

# सारोळा विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि; सारोळा

ता. औसा, जिल्हा लातूर

## संचालक मंडळ यादी

| अ.क्र. | संचालकाचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | श्री. संजय प्रल्हाद पाटील | चेअरमन |
| २) | श्री. महादु विठोबा लवटे | व्हा.चेअरमन |
| ३) | श्री. भगवंतराव त्र्यंबकराव पाटील | संचालक |
| ४) | श्री. गोपाल काशिनाथ पवार | संचालक |
| ५) | श्री. बस्वराज शेभोलिंग स्वामी | संचालक |
| ६) | श्री. दगडू यादव लोखंडे | संचालक |
| ७) | श्री. लक्ष्मण अंबाजी मातोळे | संचालक |
| ८) | श्री. नवनाथ तुकाराम शिंदे | संचालक |
| ९) | श्री. शिवहार मारुती मुळे | संचालक |
| १०) | श्री. बालाजी निहली किरवले | संचालक |
| ११) | श्री. संतोष जनार्धन भोसले | संचालक |
| १२) | सौ. रेखा गणपती भोसले | संचालिका |
| १३) | श्रीमती विमलबाई माधवराव पाटील | संचालिका |



**श्री. संजय प्रल्हादराव पाटील**
चेअरमन



**श्री. महादू विठोबा लवटे**
व्हा. चेअरमन

**श्री. जी.पी. कांबळे**
गटसचिव

# ६ वे शेतकरी साहित्य संमेलन : ठराव

**अंगारमळा ब्युरो**

कल्पनाविश्वात रमणाऱ्या आभासी शेतीसाहित्याची शेतीमधल्या प्रत्यक्ष वास्तवाशी नाळ जोडण्यासाठी, सांप्रत शेती व्यवसायाला भेडसावणार्या दाहक समस्यांची मराठी साहित्यविश्वाला जाणीव करून देण्यासाठी, नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या शेतीअर्थशास्त्र व नवतंत्रज्ञानाच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी, मराठी साहित्य-सारस्वतांची कृषिजगतासोबत सांगड घालून त्यांना कर्तव्यपूर्तीसाठी प्रेरित करण्यासाठी आणि लेखणीच्या माध्यमातून शेतीची दुर्दशा थांबवून शेतकर्याच्या आयुष्यात सुखाचे व सन्मानाचे दिवस खेचून आणण्यासाठी हातात लेखणी घेऊन लढणाऱ्या लढवैय्या शक्तिशाली सृजनशील साहित्यिकांची नवीन पिढी निर्माण करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न म्हणून दि. ८ व ९ फेब्रुवारी २०२० रोजी क्षात्रैक्य समाज सभागृह, अलिबाग जि. रायगड येथे दोन दिवशीय सहावे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन संपन्न झाले. या संमेलनात सर्वानुमते ६ ठराव पारित करण्यात आलेले आहेत.

**ठराव – १ :** भारत हा शेतीप्रधान देश आहे असे मानले जाते आणि बदलत्या स्थितीतही देशातील बहुसंख्य जनतेचे उपजीविकेचे साधन शेती हेच आहे. तरीही शेतीक्षेत्राकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. शेतकऱ्याला देशातील इतर नागरिकांप्रमाणे सुखाचे आणि सन्मानाचे जीवन जगता यावे, यासाठी शासनाने निर्णायक पावले उचलून शेतीवर झालेला अन्याय दूर करावा.

**ठराव – २ :** शेतीविषयामध्ये रुची वाढावी व सर्वार्थाने नवीन उदयोन्मुख पिढीच्या शेतीविषयक जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात म्हणून प्राथमिक, माध्यमिक शालेय आणि उच्च महाविद्यालयीन अभ्यासक्रमात शेतीसाहित्याचा प्राधान्यक्रमाने अंतर्भाव केला जावा.

**ठराव – ३ :** सध्या महाराष्ट्र राज्यासहित संपूर्ण देशात शेतकरी आत्महत्यांनी विक्राळ रूप धारण केलेले आहे. शेतकरी आत्महत्या कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस आणखी उग्र रूप धारण करत आहे, यावरून शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी आतापर्यंत केलेले प्रयत्न आणि उपाययोजना कुचकामी ठरल्या आहेत, हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्यांच्या कारणाचा शोध घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी, कृषी पत्रकार आणि शेतीसाहित्यिकांचा समावेश असलेली एक बहुआयामी अभ्यास समिती गठीत करावी.

**ठराव – ४ :** महात्मा ज्योतीराव फुले आणि युगात्मा शरद जोशी यांनी शेतीसाहीत्यात दिलेले सर्वोच्च योगदान लक्षात घेऊन राज्य शासनाने त्यांना शेती साहित्यरत्न सन्मान देऊन त्यांचा गौरव करण्यात यावा.

**ठराव – ५ :** शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने अभ्यासकांना शेतीविषयक सर्व पुस्तके सहज उपलब्ध व्हावी म्हणून शेती ग्रंथ पेढी आणि शेतकरी वाचनालय ही संकल्पना स्वीकारून अंमलबजावणी करण्यात यावी.

**ठराव – ६ :** अ. भा. मराठी साहित्य संमेलनात शेती आणि शेतकरी या विषयाला प्राधान्य क्रमाने स्थान देण्याची प्रथा सुरु केल्याबद्दल अलिबाग येथील ६ वे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्यावतीने उस्मानाबाद येथे संपन्न झालेल्या ९३ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

♦ ♦ ♦

**आता उजाड रानी, वणवा सुसाट सुटला**
**'बळीराज्य' स्थापनेची, चाहुल नक्की आहे**
**कां ठावं हे तुम्हाला, आभासी मर्कटांनो**
**गावात मात्र माझ्या, ही खबर पक्की आहे**

**नरेंद्र गंधारे, हिंगणघाट**

*****

**हाती धरून तिफन, बाप करते पेरणी**
**मातीत बीज रुजून, पोटुशी होते धरणी**

**– कृष्णा जावळे, बुलडाणा**

*****

# माझे प्रशिक्षण आणि कृती शिबीर

सौ. प्रज्ञा बापट



संघटनेच्या विचारांमुळे १९८२ पासून आम्ही संघटनेचे पाईक झालो. सुरवातीचे दिवस तर मंतरलेलेच होते. अधिवेशन आणि आंदोलनांमुळे  विचार जास्त पक्के होतं गेले. दृष्टिकोन व्यापक झाला. कुठल्याही गोष्टीचा विचार करतांना मुळापर्यंत जाण्याची सवय लागली. चांगल्याला चांगलं आणि वाईटाला वाईट म्हणण्याचा ठामपणा आला. स्वत:च्या विचारातल्या, वागण्यातल्या उणीवा जाणीवपूर्वक दूर करता आल्या. मुख्य म्हणजे शेतकरी असल्याचा आनंद आणि संघटनेचे पाईक असल्याची जबाबदारीची जाणीव, जगणं समृद्ध करत गेली.

इंडिया आणि भारत या दोन देशांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या जीवनमानातला फरक कळला. चांदवडच्या शिदोरीने तर खूप गोष्टी समजावून दिल्या. अस्तुरीच्या जल्मा नको घालू श्रीहरी म्हणण्याचा जमाना गेला.  होय! मी शेतकरी संघटनेच्या पाईकाची घरलक्ष्मी आहे.असं आनंदाने आणि ऐटीत सांगता येऊ लागलं.

संघटनेमुळे माझा वैयक्तिक लाभ तर खूपच झाला. राजीवस्त्रावर बाबू गेनूचं रक्त सांडलेलं दिसायला लागलं. त्या मागचं कापसाचं अर्थकारण कळलं आणि आजतागायत राजीवस्त्राचा संपूर्ण बहिष्कार सहज आणि ठामपणे करता आला. वाल्मीकी रामायणाचा अभ्यास करतांना, अहिल्या आणि सीता, शबरी आणि तारा  नव्याने कळल्या. त्यामुळे वस्तुस्थिती पोथीनिष्ठांसमोर आणि पूर्वग्रह दूषित स्त्री-मुक्तीवाद्यांसमोरही निर्भीडपणे मांडता आली.

शेतकरी संघटनेचा बिल्ला छातीवर लावणं ही सोपी गोष्ट नाही. मनापासून बिल्ला लावणाऱ्यांची मनं संघटनेच्या विचारांमुळे सशक्त झाली. घराघरात घरलक्ष्मीला चांगली वागणूक मिळू लागली. काही काही घरातल्या टिकोजीरावांना  घरलक्ष्मीशी, लेकराबाळांशी, म्हाताऱ्या मायबापांशी चांगलं वागण्यातला आनंद कळू लागला. आई-मुलगा, बाप-लेक, भाऊ-बहीण, दीर - भावजय,.... सगळ्या नात्याचा सन्मान संघटनेने उजळून पुन्हा शेतकऱ्यांच्या घराघरात वसवला.

सामाजिक एकता, समरसता वगैरे शब्दांच्या टिमक्या न वाजवता, जातीअंताच्या लढाईच्या तुताऱ्या न फुंकता संघटनेत ते सहज स्वाभाविक झालं. स्वातंत्र्य आणि प्रगती या शब्दांचे नक्की अर्थ कळले. आर्थिक सुबत्तेबरोबर गुणवत्ता आणि नीतिमत्ताही हवी हे समजलं. संघटनेने मला माझ्या कुटुंबाला खूप काही दिलं. मी संघटनेला काय दिलं आणि देऊ शकते असा विचार केला तर जाणवतं की स्मृती रंजन आणि स्वप्नरंजन दोन्ही गोष्टी थांबवल्या पाहिजेत.

संघटनेच्या लाखालाखाचा सभा, अधिवेशनं, रेलरोको, रस्तारोको, सरकारी दडपशाहीच्या स्मृती आणि बळीचं राज्य येणार आहे हे स्वप्न! या दोन्हीकडे तटस्थपणे बघता आलं पाहिजे. ही तटस्थता आपल्याला युगात्मा शरद जोशींनी शिकवली आहे. आपली लढाई लवकर संपणारी नाही. पिढ्यानपिढ्या लढावी लागणार आहे. आणि अगदी आपल्या सग्या-सोयऱ्यांशी लढावे लागणार आहे. एकाच घरातला शेती करणारा भाऊ आणि नोकरी करणारा भाऊ यांचं नातं भावाभावांच असलं तरी आर्थिक व्यवहारात ते शोषक आणि शोषित आहेत हे स्पष्टपणे सांगता आलं
पाहिजे.

सरकारी अनुदानं ही सरकारी कृपा न मानता आपल्या कर्जदाराने कण्हत कुंथत केलेली जुन्या कर्जाची परतफेड आहे असं समजून घेऊन सरकारी अनुदाने वसूल केली पाहिजेत. ऑफिसात तैनात केलेल्या साहेबांना त्यांच्या मायबापाची आठवण करून दिली पाहिजे. काही तरुण नाईलाजाने तर काही आव्हान स्वीकारून हिमतीने शेतीकडे वळले आहेत. त्यांना राजकीय पक्षांची लागण होऊ नये म्हणून संघटनेच्या विचारांची मात्रा देणं गरजेचं आहे. शेती हा
अभ्यासाचा विषय आहे. जमीन, पाणी, कष्ट, पैसा, वीजपुरवठा यांचं नियोजन आणि बाजारपेठेचा अभ्यास हे अनिवार्य विषय आहेत. हे फक्त संघटनाच सांगते कारण संघटनेला शेतकऱ्यांचं स्वातंत्र्य हवं आहे.

या सगळ्या गोष्टी समजावून सांगणारे, शेतकऱ्यांच्या विरोधात असणाऱ्या कायद्यांचा सखोल अभ्यास करणारे,
लोकसंग्रह असणारे, विचारांची स्पष्ट मांडणी करणारे, आंदोलनात स्वत:ला झोकून देणारे, अथक प्रयत्नांनी अधिवेशन यशस्वी करणारे, आणि माजघर शेती करणाऱ्या संघटनेच्या उद्योजिका या सगळ्यांकडून मला प्रशिक्षण मिळालं. या विषयांवरची प्रशिक्षण शिबिरे ...एस.टी. किंवा रेल्वेच्या प्रवासात, लग्नाचे स्वागत समारोह, आठवडी बाजार, बँकेत हेलपाटे घालणाऱ्यांचे घोळके अशा ठिकाणी होऊ शकतात.

विचारांचं बियाणं आपल्याकडे खूप आहे, फक्त पेरणीची वेळ साधायला हवी. त्यासाठी कर्मठ व्हावं लागेल. टिंगल, उपेक्षा, उपहास पचवावं लागेल. आपले विचार आपण सतत मांडले नाहीत तर ते आपणच विसरून जाण्याचा धोका जास्त आहे, म्हणून विचाराला वागण्याची आणि बोलण्याला कृतीची जोड द्यावी लागेल. संघटनेच्या कार्यक्रमातून माझं प्रशिक्षण अजूनही सुरूच आहे.

♦ ♦ ♦


# पहिली भेट ....... गुरु आणि शिष्याची



**भावपुष्पांजली**

**सुरेशचंद्र म्हात्रे**

३० जानेवारीला संध्याकाळी अपघात झाला, ३ फेब्रुवारीच्या दुपारपर्यंत सुधारणा दिसत असल्याचे निरोप येत होते, आता अजित धोक्याच्या बाहेर पडेल असा निश्वास टाकतो तो ४ फेब्रुवारीच्या पहाटे निरोप आला की सगळा झगडा संपला. एक स्वतंत्रतावादी, अभ्यासू, आपल्याच नव्हे तर शेतकऱ्यांसह सर्वांच्याच स्वातंत्र्याचा ध्यास घेतलेला अजित मंचावरून अंतर्धान पावला.



**आणि सहवासाच्या जुन्या आठवणींनी डोक्यात गर्दी करायला सुरुवात केली. सर्वप्रथम समोर आला तो, एरवीही काही ना काही संदर्भाने समोर येत असे तो, अजित नरदेचा सर्वात प्रथम पाहिलेला चेहरा.**

१९८१ सालच्या मे महिन्याचा दुसरा आठवडा असावा. निपाणीचा तंबाखू आंदोलनाचा १ मे चा 'विजयमेळावा' आटोपून, दोन तुरुंगवास, कोर्टातील केसेस आणि तुरुंगातून सुटल्यानंतर निपाणी परिसरातील आंदोलक शेतकरी आणि कार्यकर्ते यांच्या गाठीभेटी यांनी थकलेले शरद जोशी पुण्याला परतले होते. मी काही दिवस निपाणीत थांबून अलिबागकडे जाताना पुण्यात थांबून शरद जोशी यांना भेटण्यासाठी त्यांच्या, औंधमधील सिंध हाउसिंग सोसायटीतील 'मृद्गंध' बंगल्यात गेलो होतो. दारावरील बेल वाजली, दार उघडले तर समोर काखेत कागदांचे भेंडोळे धरलेला तरुण म्हणाला, 'मी अजित नरदे, शरद जोशींना भेटायला आलो आहे.' शरद जोशी आतूनच म्हणाले, 'या.' आत आल्याबरोबर अजितने सोबत आणलेला 'साप्ताहिक दिनांक'चा समोर ठेवला. मुखपृष्ठावर पोलिसी गोळीबारात मरून पडलेला सत्याग्रही आणि उद्ध्वस्त सायकलींचा खच. आणि 'खाली तंबाखू शेतकऱ्यांची दुहेरी कत्तल!' अशी ओळ. शरद जोशींनी पाने उलटून अंकातील 'दर्शनी कथा' म्हणून अजितने लिहिलेला लेख वाचला आणि मग भानावर येऊन अजितचा पाहुणचार केला. अजितने निपाणी आंदोलन पत्रकार म्हणून (बहुदा शेतकरी म्हणून अधिक असावे) बारकाईने पाहिले होते. त्यामुळे पाहिलेले किती सांगू, काय काय सांगू म्हणून तोच बराच वेळ बोलत होता. आणि मग दोघांची नाळ जुळली ती शेवटापर्यंत, दोघांच्याही, कोणत्याही कारणाने तुटली नाही.

शेतकरी संघटनेच्या सर्व कालावधीत मी आणि अजित, आमचे नाते भावांप्रमाणे राहिले. काही लिहिले की वाचायला पाठवून विनासंकोच मत विचारायचा, काही सूचना केल्या तर त्यावर विचार करायचा. शेतकरी संघटकसाठी कार्यकर्त्यांच्या लिखाणापैकी सर्वाधिक अजीतचेच आहे. त्याने शरद जोशी गेल्यानंतर इतर कार्यकर्त्यांच्या सहकार्याने 'तंत्रज्ञानस्वातंत्र्या'चा जो लढा उभारला त्या वेळी त्याचे शेतकरी संघटकमधील लेख शोधले तेव्हा त्याचे एक पुस्तक होऊ शकेल इतके लेख सापडले. इतके लेख सापडले त्याचे त्यालाही आश्चर्य वाटले. ते पुस्तक काढायचे असे आम्ही ठरवले होते, आता ते त्याच्याशिवायच काढावे लागेल.

आता त्याचे 'साखर डायरी'मधील सहकारी त्याच्या स्मरणार्थ 'सा. साखर डायरी'चा विशेषांक काढणार आहेत. त्याच्यासाठी अजितचे शरद जोशींबरोबरचे काही फोटो पाठवा म्हणून फोन आले. आणि मी लगेच शोधाशोध सुरू केली. बराच वेळ शोधाशोध झाल्यानंतर माझा मी मलाच हसलो. अजित काही पुढे पुढे करणारा कार्यकर्ता नव्हता; त्याचे कसे असे फोटो मिळणार? दोनचार मिळाले ते पाठवून दिले.

अजितने कधीही अभ्यासाशिवाय लिहिले नाही. आणि त्या अभ्यासावर आधारित आपण जी मांडणी करतो ती काही मंडळी समजून घेत नाहीत याची त्याला फार खंत वाटत असे. त्याबद्दल राग न धरता तो सातत्याने ते समजावून देण्याची धडपड करीत राही. त्याच्यासारख्या अभ्यासू कार्यकर्त्यांची संख्या फार कमी आहे. आजकालतर समाजमाध्यमांवर वायफळ चर्चा म्हणजेच संघटनेचे काम असे स्वरूप झाले आहे. काही दिवसांपूर्वी एका Whatsapp ग्रुपवर एका वादविवादावर अजितने सूचना केली होती की अशी एकमेकांची उणीदुणी काढू नये. तर एका युवा कार्यकर्त्याने अजितच्या, संघटनेतील कार्याचा लेखाजोखाच मागितला आणि इतर काहींनी त्याला दुजोराही दिला. अजित काय करणार? फोन करून उद्वेगाने म्हणाला, 'वावरात असं गबाळ माजल्यावर पीक कसं जगणार?'

अजितच्या जाण्याने शेतकरी चळवळीत जी पोकळी निर्माण झाली आहे ती भरून निघणे केवळ अशक्य आहे.

♦ ♦ ♦

# कृषी उत्पन्न बाजार समिती

## हिंगणघाट, जि. वर्धा.

**समितीची ठळक वैशिष्टे**

१) समिती आवारात रु.१ मध्ये भरपेट जेवन, निवासाची व्यवस्था, सकाळी मुखमार्जनाचे आवश्यक साहित्य व नि:शुल्क चहा

२) समिती आवारात शुलभ शौच्छालय तसेच शुद्ध व थंड पिण्याचे पाण्याची व्यवस्था

३) संपुर्ण आवारात सिमेंटीकरण, आवाराला सुरक्षा भिंत तसेच २४ तास सुरक्षा व्यवस्था

४) समिती आवारात उभारणी करण्यात आलेल्या लिलाव शेडच्या व्यतिरिक्त MACP प्रकल्पाअंतर्गत ९०००० स्केफुट मध्ये भव्य लिलाव शेडची उभारणी.

५) समिती आवारात ४ Mbps लिजलाईन व वायफाय ची सुविधा तसेच १००% ई-लिलाव प्रणालीची अंमलबजावणी

६) हायटेंशन लाईनसह १४० केव्हीए जनरेटरची सुविधा तसेच ईलेक्ट्रॉनिक्स काटयाद्वारे शेतमालाचे मोजमाप

७) RKVY योजनेअंतर्गत धान्य यार्डवर २ मे टन प्रती तास क्षमतेच्या ग्रेन क्लिनिंग मशिनसह शेडची उभारणी.

८) बाजार भाव व इतर माहितीकरिता निशुल्क एस.एम.एस. व टोल फ्री क्रमांकाची सुविधा (टोल फ्री क्र.१८००८४३१००१).

९) उपबाजार येथे रु.१०००/- मध्ये बिछायत भांडयासह मंगल कार्यालयाची व्यवस्था.

१०) कापुस मार्केट यार्ड येथे भव्य प्रशासकीय इमारतीचे काम सुरू.

११) तारण योजने करिता वर्षभर ६% व्याजदरावर कर्जाची व्यवस्था, समिती स्वनिधीतून नांदगाव यार्ड येथे ३८०० मे. टन क्षमतेचे गोदाम उभारणीचे कामकाज सुरू याव्यतिरीक्त RKVY योजनेअंतर्गत १००० मे. टन क्षमतेच्या गोदामाची उभारणी.

१२) कृषिवर आधारीत चर्चा सत्राचे आयोजन तसेच कपाशीवरिल गुलाबी बोंडअळीचे नियंत्रणाकरिता १,०४,३११ फेरोमन ट्रॅपचे ७५% अनुदानावर वितरण.

१३) समिती कार्यक्षेत्रात ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या स्मशानभुमीमध्ये हॅन्डपंपची उभारणी तसेच पांधनरस्त्याचे अनुदान तत्वावर मातीकाम.

१४) सर्पदंशाने शेतकऱ्याचा मृत्यु झाल्यास रु.१०,०००/-, बैलमृत्यु झाल्यास रु.१५,०००/- तर इतर नुकसानीच्या अनुषंगाने रु.७५००/- पावेतो अर्थीक मदत वितरीत केल्या जाते.

१५) शेतकरी-शेतमजुर, हमाल-मापारी यांचे पाल्यांना अभियांत्रिकीय द्वितीय वर्षाला प्रवेश घेणाऱ्यांना अनुदान तत्वावर लॅपटॉप, अनुदानावर व्यावसायीक अभ्यासक्रम तसेच उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.

१६) जिल्हा परिषद शाळांना सिलींग फॅनचे वितरण.

१७) परवानाधारक हमाल मापारी यांचेकरिता विमा संरक्षण.

१८) कापुस तारण योजना व सामुहीक विवाह सोहळ्याचे यशस्वी आयोजन.

१९) शेतकऱ्यांना निशुल्क फळझाडे व सावली वृक्षांचे वितरण

आगामी महत्वाकांक्षी योजना :

१) धान्य मार्केट यार्डचा संपुर्ण परीसर CCTV कॅमेऱ्याच्या नियंत्रणात करण्याचे दृष्टीने अंमलबजावणी सुरू.

२) शेतमाल आवक वाढीच्या दृष्टीने ईनामी योजना राबविणेबाबत कार्यवाही सुरू.

३) शेतकऱ्यांना वैद्यकिय सेवा पुरविण्याबाबत बाब विचाराधीन.

४) शितगृह उभारणी.



**ॲड. सुधीर कोठारी**
सभापती

**संचालक मंडळ**

**सर्वश्री : हरिष वडतकर (उपसभापती), मधुकरराव डंभारे, ओमप्रकाश डालिया, उत्तमराव भोयर, शेषकुमार येरलेकर, विनोद वानखेडे, अशोकराव उपासे, राजेश मंगेकर, सुरेश सातोकर, बापुरावजी महाजन, बळीरामजी नासर, सुरेश वैद्य, पंकज कोचर, संजय कात्रे, सौ.सुरेखाताई सायंकार, सौ.माधुरीताई चंदनखेडे, संजय तपासे, राजेश कोचर, संजय जैन, टि. सी. चांभारे (सचिव)**

# अजातशत्रू 'अजित'

**अनंत देशपांडे**



एका बेजबाबदार दुचाकीस्वाराने अजित नरदे याला धडक दिली आणि दवाखान्यातील चार दिवसाच्या झुंजी नंतर, अजित नरदे जीवनाचा खेळ हरला आणि मृत्यू जिंकला. अजित गेल्याची अप्रिय बातमी कानावर आली आणि काळजात खड्डा पडला. एक अनन्यसाधारण, अत्यंत अभ्यासू आणि तर्ककठोर विचार करणारा बिनीचा शिलेदार आपण गमावला. शरद जोशी यांना ऐंशीच्या दशकात महाराष्ट्रात जे हिरे गवसले त्यातील अजित वरच्या फळीतला. १९८१ सालात झालेल्या निपाणी येथील तंबाखू आंदोलनापासून अजित शरद जोशी आणि शेतकरी संघटनेशी जोडला गेला तो शेवट पर्यंत.

अजितचे वडील नागेंद्र नरदे हे जयसिंगपूर येथील स्वातंत्र्य सैनिक, स्वातंत्र्य लढ्यात अनेक वेळा वेगवेगळ्या जेल मध्ये गेलेले. इंग्रजांच्या विरुद्ध देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटणारे आणि लढणारे जाज्वल्य कार्यकर्ते. तिकडे भगतसिंगाला अटक झाली आणि इंग्रज त्यांना फासावर चढवणार हे पक्के झाले. इकडे नागेंद्र नरदे यांनी काहिही करून भगतसिंगाला जेलमधून बाहेर काढायचे यासाठी आटोकाट प्रयत्न केले. (अर्थात ते सगळे गुप्तपणे) त्यासाठी ते बोटीने पेशावरला गेले, त्यांनी भगतसिंग ज्या जेलमध्ये आहेत ती जेल फोडण्यापासून अनेक पर्याय तपासून पहिले, पण हेतू साध्य झाला नाही.

अजित अशा क्रांतिकारकाच्या पोटी जन्मलेला, आपल्या वडीलांसारखाच क्रांतिकारी. पडद्यामागे, प्रसिद्धीपासून चार हात लांब राहून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारा कार्यकर्ता. त्याला साखर डायरी सुरु करायची होती. शरद जोशी यांना त्याने तसे सांगितले, शरद जोशी यांनी त्याला एक अट घातली.तुला शेतकरी संघटनेचे आणि माझे नाव तुझ्या व्यावसायिक कामासाठी वापरता येणार नाही. त्यानेही ती अट मान्य केली. तेंव्हा पासून शेतकरी संघटनेचा बिल्ला आणि नाव त्याच्या व्यवसायिक कामासाठी तो कधीही वापरत नसे, अगदी शरद जोशी गेल्यानंतरसुद्धा अगदी आतातापर्यंत. ऐंशीच्या दशकात शरद जोशी यांच्या शेतकरी चळवळीत कोणताही वैयक्तिक अजेंडा नसलेल्या चळवळीला समर्पित असलेल्या कार्यकर्त्या पैकी अजित एक, म्हणूनच तो शेवटपर्यंत शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी प्रामाणिकपणे झुंजत राहिला. ऐंशी सालात सहकाराचा आणि काँग्रेसचा गढ असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी संघटनेचे काम करणे मोठ्या धाडसाचे आणि हिम्मतीचे. जयपालअण्णा फराटे आणि अजित नरदे यांनी इतर मोजक्याच कार्यत्यांना सोबत घेऊन शेतकरी संघटनेचे काम कराण्याचे धाडस केले.

अजितचा अभ्यासाचा परीघ भलामोठा दांडगा. कापसापासून ऊसापर्यंत, जैव शेतीं असो कि झिरो बजेट शेती, खुला व्यापार असेल की शेतकरी विरोधी घटना दुरुस्त्या आणि कायदे, शेतकऱ्यांची राजकारणातील भूमिका असो की, अर्थकारणावरील तर्कसंगत मांडणी, कितीतरी व्यापक क्षेत्रात तो सहजपणे वावरायचा. प्रत्येक क्षेत्रातील अभ्यास आणि कार्यकारणभाव लक्षात घेवून तर्काच्या आधाराने त्या विषयाचा विचार करण्याची आणि मांडण्याची हातोटी त्याच्याकडे होती. शेतकऱ्यांना बाजारपेठेचे, आणि तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य मिळणे महत्वाचे आहे, ते मिळाले की शेतकऱ्यांना कोणत्याही मदतीची गरज पडणार नाही या शरद जोशी यांच्या विचाराचा अजितवर प्रभाव. अजीतसारख्या कार्यकर्त्यांनी शरद जोशी यांच्या स्वतंत्रतेच्या विचारांना समृद्ध केले. ऐंशीच्या दशकात शेतकरी चळवळीत शरद जोशी यांच्या संपर्कात वैचारिक पातळीवरील जे परिपक्व आणि स्व-प्रकाशित अगणित कार्यकर्ते आले, त्यातील अजित पहिल्या फळीचे नेतृत्व करणारा.

एकदा माझा आणि अजितचा ऊस, सहकार आणि त्यावरील सरकारी निर्बंधाबद्दल बराच वाद झाला. मी साखर उद्योग संपूर्ण निर्बंधमुक्त करण्याच्या बाजूचा तर अजित एवढा मोठा रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या उद्योगाला सरकारचे संरक्षण असावे याबद्दल संवेदशील असलेला. मी त्याला म्हणालो यार, ऊसाच्या अतिरिक्त सरकारी संरक्षणामुळे मराठवाड्यासारख्या कमी पाण्याच्या प्रदेशातील पाण्याची पतळी हजार फुटाच्या खाली गेली आहे, आमचा हा वाद कायम चालूच राहायचा. सरकारच्या अतिरिक्त संरक्षामुळे, संरक्षित पिकाचे अतिरिक्त उत्पादन तर होतेच, शिवाय शेतकऱ्यांना संरक्षण देण्याच्या नावावर सरकारी तिजोरीवर जो डल्ला मारला जातो तो वेगळाच, सहकाराने ते सिद्ध केले आहे. ऊसाशिवाय गहु आणि तांदूळ या प्रमुख पिकांनाही सरकारचे संरक्षण आहे, ही तिन्ही पिके भरपूर पाणी पिणारे. तरीही या पिकांचे अतिरिक्त उत्पादन आपण करतोच आहोत. हे अत्यंत बेजाबादारपणाचे आहे समस्या वाढवणारे आहे हे त्यालाही मान्य होते. गहू आणि तांदळाची खरेदी करून तो सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या मार्फत वाटप करण्याचा अत्यंत खर्चिक आणि अव्यवहार्य अव्यापारेशु व्यापार आपले सरकार करते याबद्दल तो अस्वस्थ असायचा.

शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे आणि शरद जोशी यांच्या प्रयत्नामुळे BT कापसाच्या लागवडीला सरकारने २००२ साली परवानगी दिली त्यामुळे भारतात कापसाचे उत्पादन प्रचंड वाढले. त्यामुळे साधारण सात कोटी लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे, त्याला BT कापसाची लागवड कारणीभूत आहे. हिरव्या

बोंडअळीला प्रतिकार करण्याची क्षमता असलेले हे बियाणे शेतकऱ्यांना वरदान ठरले, हे बियाणे वापरायला मिळाले पाहिजे यासाठी शेतकरी संघटनेने मोठा संघर्ष केला होता त्यात अजितचा वाट मोठा. त्याच धर्तीवर HTBT हे बियाणेही अधिकृतपणे वापरण्याचे शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे यासाठी शेतकरी संघटना आणि अजित आग्रही राहिले आहेत. तणनाशकाच्या फवारणीपासुन संरक्षण प्राप्त करू शकणाऱ्या या बियाण्यामुळे शेतकऱ्यांचा खुरपणीचा खर्च आणि वेळ वाचतो. गेल्या कांही वर्षात HTBT कपाशीच्या अनधिकृत बियाण्याची महाराष्ट्रातील शेतकरी मोठ्या प्रमाणात पण गुप्तपणे लागवड करीत आहेत. गेल्या वर्षी अजित आणि ललित बहाळे यांच्या नेतृत्वात अनधिकृत HTBT कपाशीच्या लागवडीचे आंदोलन वाजतगाजत आणि उघडपणे केले. असा अनधिकृत कापूस लावण्यात शेतकऱ्यांची फसवणूक होण्याचा धोका आहे हे माहिती असूनसुद्धा शेतकऱ्यांनी तो धोका पत्करून त्या कपाशीची लागवड केली, आणि हे आंदोलन केले. त्याची जागतिक पातळीवरील प्रसिद्धी माध्यमांनीही योग्यती दखल घेतली. BT वांग्याच्या सगळ्या चाचण्या झाल्या आहेत, त्याची लागवड करण्यात कोणताही धोका नाही, असे केंद्रीय तांत्रिक संस्थांचे रिपोर्ट्‌र्स असताना सरकार त्याच्या लागवडीसाठी परवानगी देत नाही. येणाऱ्या वर्षात या वांग्याच्या BT वाणाची वाजतगाजत सरकारला न जुमानता लागवड करण्याचा अजितने संकल्प केलेला होता त्या आधीच तो गेला. ती जबाबदारी यापुढे कोण अंगावर घेईल पाहूया. संकरीत असो की GM आणि HTBT बियाणे, हे बियाणे अनेक कंपन्या तयार करीत असतात. BT आणि HTBT या प्रकारचे बियाणे तयार करण्यात मोनस्यांटो ही कंपनी आघाडीवर आहे, या क्षेत्रात तिची मक्तेदारी आहे. कोणत्याही पिकाचे BT आणि HTBT बियाणे वापरण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना असले पाहिजे अशी मागणी लावून धरणाऱ्याला, तथाकथित पर्यावरणवादी आणि रासायनिक लॉबीच्या तालावर नाचणारे लोक, मोनास्यांटो कंपनीचे दलाल ठरवतात. शरद जोशी यांनाही लोकांनी दलाल ठरवले होते आणि अजीतलाही ठरवले, अजितला त्याची पर्वा नव्हती.

अफाट वाचन, सतत लिहित रहाणे, शिबिरे आणि सभांमधून भाषणे करणे, वेगवेगळ्या चर्चेतून सहभाग, प्रत्यक्ष आंदोलनात आघाडीवर राहणे, अशा विविध आघाड्या सांभाळणारा अष्टपैलु आणि अनन्यसाधारण व्यक्तिमत्वाचा आणि संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता अजित गेला. आणखी एका त्याच्या वैशिष्ट्याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे तात्विक चर्चेत त्याचा कोणाशीही कितीही टोकाचा वाद झाला तर तो त्याच्याशी व्यक्तिगत संबंध बिघडू देत नसे, तो खऱ्या अर्थाने अजातशत्रू होता. अजित बद्दल लिहिण्यासारखे कितितरी विषय आहेत. त्याच्या शिवाय आपल्याला आता वाटचाल करावी लागणार आहे हे मन मान्य करायला तयार नाही. नियतीपुढे कोणाचे चालत नसते म्हणतात ते मान्य करुन आपल्याला शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा आणि तंत्रज्ञान स्वातंत्र्याचा लढा अजित शिवायच चालू ठेवावा लागणार आहे, अजीतसाठी तीच खरी श्रद्धांजली असेल,

अलविदा अजित.

**– अनंत देशपांडे**
**पुणे**

**खाणार काय सांगा शेती करून माती ?**
**विळख्यात जर ऋणाच्या आयुष्य जात आहे !**

**– प्रदीप थूल, हिंगणघाट**

*****

**कृषिकर्म एक हुकमी पत्ता असून देखिल**
**खेळात मिळकतीच्या त्याचीच हार आहे**

**– धीरजकुमार ताकसांडे, हिंगणघाट**

*****

**शेतकरीच जर संपावर गेला तर**
**या पृथ्वीच्या अस्तित्वालाच लागेल घोर**
**ठणकावून सांगतय लेखणीतून**
**हे कास्तकाराचं पोर**

**– अनिकेत जयंतराव देशमुख, अकोला**

*****

# अजित नरदे : एक लिबरल अर्थवादी आंदोलक





**डॉ. शाम अष्टेकर**

अजित नरदे गेले, एक कुणी बाईक स्वार येतो काय आणि रास्ता क्रॉस करणाऱ्या अजितला धडकून जातो काय आणि तीन दिवसात अजित गेल्याची बातमी येते काय सारेच सुन्न व हतबल करणारे. सांगली च्या हॉस्पिटल मध्ये त्याला दाखल केली, तब्बेत सुधारतेय असा अर्जुनचा फोन झाला. आणि अचानक सकाळी तो गेल्याचे कळले. माझा एक बुध्दिवादी आंदोलक आणि मित्र, अस्तंगत झाला. गेल्याच महिन्यात अजित आणि अर्जुन माझ्याकडे नाशिकला मुक्कामाला होते, खूप गप्पा झाल्या. परत ३-४ दिवस राहायला येईन अजेंडा नसलेल्या गप्पा मारू या असे ठरले होते. कारण तसेच होते, जी एम , सुधारित नागरिकत्व कायदा आणि एकूण देशाची आर्थिक परिस्थिती, मोदी सरकारचे आर्थिक अडाणीपण या सगळ्या गप्पा फोनवर आणि मोबाईल मीडिया वर मारून झाल्या होत्या, त्यातून नवे काही निघत नाही तेच मुद्दे येताहेत असे दिसल्यावर मीच म्हणालो, दुसरा काही विषय तुला नाही काय? गप्पा मारायला कितीतरी विषय आहेत, शास्त्रीय संगीत, जैन तत्वज्ञान, अमेरिका आणि लिबरल अर्थराजकारण असे कितीतरी विषय आहेत. पण हा योग् यायचा नव्हता. नाशिकला येताना आमच्यासाठी सांगलीची वांगी आणि भडंग आणणे त्याला अनिवार्य होते. त्यावरून आमचे एकदा थोडे गोड भांडण पण झाले होते. आता खोलवर विचारात गढलेला अजित, वाद घालणारा अजित भेटणार नाहीय. आपले काय हरवले हे कळायला बरेच दिवस जायला लागतील बहुतेक.

अजितची आणि माझी मैत्री शेतकरी संघटनेतली. मी संघटनेकडे आकृष्ट झालो ते शरद जोशी यांच्या बुद्धिवैभवाकडे पाहून, पण संघटनेत त्यामानाने अशी इतर माणसे नव्हतीच जवळजवळ. छात्र युवा संघटनेतली आणि संघाच्या जवळची काही मंडळी ऐंशीच्या दशकात होती, ती नंतर अनेक वाटानी निघून गेली, कारणे अनेक, पण बहुधा शरद जोशींचा लिबरल अर्थवाद न पटल्यामुळे असावे. टिकून राहणाऱ्या मंडळीमंध्ये अजित एक प्रमुख कार्यकर्ता आणि लेखक. शेतकरी संघटक मध्ये शरद जोशींच्या खालोखाल त्याचेच लेखन जास्तीत जास्त असेल. निवडणुकांबद्दल संघटनेची भूमिका अजित कायम व्यवस्थित मांडत आला, ते अगदी २०१९ च्या निवडणुकांपर्यंत. (संघटना आता निवडणुकांना अक्षम आहे असे त्याचे म्हणणे तो फोनवर कळकळीने मांडत राहायचा.) पण त्याचे खरे बुद्धीवैभव दिसले ते उसाप्रश्नाबाबत त्याने सातत्याने घेतलेली अर्थवादी भूमिका वाचताना. राजू शेट्टी याना अजितनेच तयार केले आणि पुढे आणले. तिथल्या स्थानिक राजकारणाने शेट्टी बाहेर गेले, आणि एक लढाऊ माणूस संघटनेपासून वेगळा झाला याचे त्याला वाईट वाटायचे. पण राजू शेट्टी उसप्रश्नाबाबत कायम गोंधळलेले आणि दुटप्पी (राजकारणी) भूमिका घेऊन वावरत असतात याबद्दल त्याचे ठाम मत अजितने अनेकवेळा जाहीरपणे आणि कठोरपणे मांडले. जी एम प्रश्नाबाबत बौद्धिक दृष्ट्या शेट्टी उघडे पडले असे अजितचे नेहेमी बोलणे असायचे, आता राजू शेट्टीकडून शेतकरी चळवळीने फार अपेक्षा ठेऊ नयेत अशी अजितची खात्री झाली होती, भले स्वाभिमानी शेतकरी संघटना किती वाढो अथवा पसरो. मी शरद जोशी यांच्या संघटनेतून कधी बाहेर जाणार नाही कारण बौद्धिक दृष्ट्या शरद जोशी समकालीन नेत्यामंध्ये अद्वितीय होते, त्यांची वैचारिक भूमिका आजही शेतकरी प्रश्नावर मार्गदर्शक ठरू शकते असे अजित म्हणायचा आणि त्याचा संदर्भ देत असे. पण आंधळे गतानुगतिक अनुयायीपण अजितने केले नाही. प्रसंगी जोशींशी असलेले मतभेद त्याने स्पष्टपणे मांडले. जी एम पिकांबाबत केंद्र सरकार आणि स्वदेशी लॉबीचे शेतकरी-घातक राजकारण, झिरो बजेट शेती याबद्दल अजित इतके कोणीच लिहले अथवा बोलले नाही. २०१९ मधली त्याची जी एम आंदोलनाची बातमी जगभर गेली. दारुबंदीच्या चळवळीला पण त्याने 'दांभिक' असे विशेषण लावले. पर्यावरण, गाडगीळ अहवाल, जैतापूर वगैरे सर्वे प्रश्नाबाबत अजित सातत्याने एक लिबरल अर्थवादी भूमिका सातत्याने मांडत राहिला.

क्ळइढ बियाण्याबाबत त्यांनी केलेल्या मांडणीवर संघटनेतच काही मतभेद होते, अजित त्यावर ठाम राहिला. काही मित्र दुरावले पण नवे आंदोलन झाले, जगभर त्याची वार्ता गेली. शरद जोशीनंतर अशा प्रश्नावर आंदोलन करणारा तो पहिलाच, त्यासाठी सर्व बौद्धिक आणि संघटनात्मक तयारी त्याने केली, गावोगाव फिरला. तो मोन्सॅन्टोची बाजू घेत आहे असा आरोप देखील झाला पण टेकनॉलॉजिच्या बाबतीत कंपनी चे नाव घेतल्याशिवाय विचार आणि आंदोलन कसे करणार असा त्याचा सवाल असायचा.

अजित आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होता, साखर डायरी सुरु केल्यावर आर्थिकदृष्ट्या अजित यशस्वी झाला पण आंदोलन त्याने थांबवले नाही. ऊस आणि साखर प्रश्नाबाबत त्याच्यासारखा तज्ज्ञ मी पहिला नाही. महाराष्ट्रात साखर कारखाने कायम तोट्यात आणि गुजराथेत मात्र उसाला चांगला भाव देऊनही फायद्यात, हे गौड बंगाल त्याने उकलून दाखवले. पण महाराष्ट्राने त्यामानाने त्याची उपेक्षा केली असे मला वाटते.

नाशिकच्या भेटीत त्याच्या सिएटल मधल्या मुलीचा आणि

**उर्वरित भाग पुढील पानावर**

# Story of common man with uncommon zeal

Adv. Satish Borulkar





अलिबाग संमेलनातील खास सत्रात स्व. अजित नरदे यांच्या स्मृती जागवताना ब. ल. तामस्कर

Yugatma Sharad Joshi propounded the theme of freedom of technology for the farmers. The successive governments ignored and denied this freedom of technology to the farmers. Freedom of technology was unfulfilled dream of Late Sharad Joshi. During the lifetime of Sharad Joshi, Shri Ajit Narde dedicated himself to the cause of freedom of technology to the farmers. His intellectual contribution on this subject was immense but the same remained ignored and neglected.

In recent years, when Shetkari Sanghatana at his instance again took on his Agenda, the issue of Freedom of Technology. Ajit Narde was on forefront, he plunged in this unsung agitation with all his uncanny dedication. In the recent years, he had made this issue as his life goal. He was convinced that the Farmers Bhagyavahini is not in the loan waiver or some sundry subsidies and doles but the same lies in the empowerment of farmers with contemporary technology. It was his vision that the advance technology in the field of seeds which is the only run-way for farmers aviation. He has proved with the data that GM technology has a potentiality to uplift the Agriculture production. In his opinion, lack of freedom of market and technology in the agriculture sector haseffect of disinclination of youths of this country to enter agriculture. It was not only his intellectual contribution in the field, but it was his personal intervention in the case of a farmer from Haryana Mr. Saini resulted in showing path to Shetkari Sanghatana to adopt the issue of freedom of market and technology for the benefit of not only farmers community in Maharashtra but also the entire Country.

The agitations followed for demand of freedom of market and technology had his prints. The cause of farmers reached beyond 7 seas and that is only because of zeal of one person Shri Ajit Narde.

In various interactions with him, to some extent the spirit of freedom of market and technology percolated in my mind. In am convinced that this freedom which is denied to the farmers by successive Governments needs to be snatched with the farmers unity. The flag-bearer is no more but the flag needs to be carried afloat by us. In my opinion, that will be a true homage to Shri Ajit Narde. Let us take a solemn move that we inculcate the same zeal of Shri Ajit Narde and that is why I referred him "a common man with uncommon zeal"

**Adv. Shri Satish Borulkar, Mumbai**

**मागील पानावरून पुढे...**

जावयाचा आणि नातवंडांचा विषय निघाला, फोटो दाखवले, ती परत भारतात येणार आहे. पण परदेशांमध्ये पर्यावरण सांभाळून पण किती आर्थिक प्रगती होते याबद्दल कौतुक होते, आपले पर्यावरणवादी भंपक आणि विकाऊ आहेत असे त्याचे प्रतिपादन होते. मैदानात उतरून वादावादी करायला तो कचरत नव्हता. पण जी एम संबधी त्याचे लढाई अपूर्ण राहिली. त्याच्या शिवाय जी एम लढाईला शेतकऱ्यांकडे माणूस नाही. ती उणीव भरून निघेल अशी प्रार्थना आहे. माझा एक आणि प्रामाणिक मित्र बाइकस्वाराने संपवला आहे. निदान यासाठी तर भारतात रस्ते सुरक्षा महत्वाचा मुद्दा ठरायला पाहिजे.

**डॉ. शाम अष्टेकर**

**नाशिक ९४२२२७१५४४**

**जगण्याला प्रतिष्ठा देणारे संमेलन**



यंदाचे ६ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन अलिबाग येथे यशस्वी पणे पार पडले, बळीराजा हा पिढ्यानपिढ्या न्याय व हक्कासाठी लढत आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे परंतु, ह्या देशातील शेतकरी हा नेहमी उपेक्षित वंचित घटक म्हणून जगत आला आहे. चर्चा सत्रातून शेती विषयक वैचारिक चिंतनातून प्रखरतेने वास्तववादी भीषण समस्या, परिस्थिती समोर आली. शेतमालाला भाव आणि बळीराजाला समाजात वावरताना प्रतिष्ठा पुन्हा एकदा मिळवून देण्यासाठी एल्गार पुकारला गेला. ह्या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून राज्यामधून मोठ्या प्रमाणात साहित्यिक, विचारवंत व शेतकरी दाखल झाले. संमेलनाच्या माध्यमातून जे काही महत्त्वाचे ठराव संमत झाले ते शासनाकडे पाठपुरावा करून शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न झाले ते निश्चित लाभदायी ठरेल.

कार्याध्यक्ष मुटे सरांनी केलेलं साहित्यातील कार्य-योगदान भविष्यात बळीराजाच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चित लाभ देणारे ठरणार यातही माझे दुमत नाही. तसेच शेतकरी गझल मुशायऱ्याचे जनक किंवा निर्माते, म्हणून मुटे सरांकडे भविष्यात बघितल्या जाऊ शकते कारण प्रारंभी पासून त्यांनी शेतकरी गझल लिहिल्या. त्या पूर्वी लिहिण्याचा अपवादात्मक प्रयत्न झाला असू शकते परंतु खऱ्या अर्थाने शेतकरी गझल लिखाणाला व्यासपीठ, प्रतिष्ठा, नावलौकिक मिळवून देण्याचे काम त्यांनी केले. शेतकरी साहित्य चळवळीद्वारे शेतकऱ्याच्या मालाला भाव आणि जीवन जगण्याला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी उपयोगी पडेल हे ही ह्या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. साहित्यिक मंडळी कडून भविष्यात बळीराजाच्या दशा आणि दिशा लेखणीचा माध्यमातून जगण्याचे बळ तयार करण्यासाठी प्रयत्न करतील ही अपेक्षा व्यक्त करतो व शेतकरी साहित्य चळवळीला शुभेच्छा व सदिच्छा देतो.

**- गणेश गंगाधर वरपे**

**जालना मोब : ७३८५८५१६५०**

*****

**व्यवस्थेचा खरा चेहरा दाखवणारे संमेलन**



सहावे अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलन २०२०, अलिबाग येथे अगदी व्यवस्थित आणि उत्तमरीत्या पार पडले. या सगळ्यांमागे असणाऱ्या नियोजनामुळे हे सगळं घडून आले. त्यासाठी अथक परिश्रम घेणारे मुटे सर आणि त्यांचे सर्व सहकारी यांचा मोलाचा वाटा आहे. कितीतरी साहित्य संमेलने अलीकडच्या काळात होतात पण त्यामधून उच्चवर्गीयांच्या मनोरंजनासाठी साहित्य निर्माण होते. त्यामुळे समाजहिताचं, सामान्यांच्या व्यथा मांडणार साहित्य मांडल्या जात नाही.

शेतकरी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून सामान्यांच्या, कष्टकऱ्यांच्या आणि सगळ्याच थरातील साहित्य निर्माण झालंय. ही या संमेलनातील महत्त्वाची बाब आहे. साहित्याच्या क्षेत्रात कार्यरत काही संस्था साहित्याच्या जबर निकष मांडतात. त्यामुळे सामान्यांना साहित्य निर्माण करण्यास, आपली व्यथा लोकांपर्यंत पोहचवणे शक्य नव्हते. या शेतकरी साहित्य मंचामार्फत तेच लोक आता आपल्या मनातील भावना मांडण्यास तसेच व्यवस्थेचा खरा चेहरा दाखवण्यात सफल ठरलेत.

नवीन चेहऱ्यांना सातत्याने समोर आणण्याचे काम या मंचाच्या माध्यमातून होते. सकस शेतकरी साहित्य निर्मिण्याच्या या ध्येयास यशस्वी करण्याचे काम आपणा सर्वांवर आहे. सलाम या माणसांच्या कार्याला.

**- कृष्णा जावळे**

**बुलडाणा**


*****

**तेजस्वी धारदार विचार**

मार्च, २०१९ च्या अंगारमळा अंकातील सौ. प्रज्ञा बापट यांचा शेतकरी स्त्री : गुलामांची गुलाम हा ग्रामसंस्कृती या सदरातील लेख अत्यंत आवडला. अत्यंत नेमकी आणि प्रामाणिक भाषा, विषयाचा दांडगा व्यासंग आणि परिवर्तनाची आंतरिक तळमळ या लेखातून दिसून येते. आमच्यासारख्या सुशिक्षित स्त्रियांना स्वतःची जागा दाखवून दिल्याबद्दल सौ प्रज्ञा बापट यांचे मनपूर्वक अभिनंदन आणि त्यांचे विचार आमच्या पर्यंत पोहोचवल्याबद्दल आपलेही आभार. साचेबद्ध शिक्षणाच्या बरोबरीने शेतीविषयक शिक्षण आणि शेतीपूरक शिक्षण घेण्याबद्दलचा त्यांचा विचार अत्यंत महत्त्वाचा आणि आवश्यक आहे. वैचारिक गुलामगिरी झुगारून देण्याचा साक्षात वस्तूपाठ म्हणजे प्रज्ञा बापटांचा शेतकरी स्त्री गुलामांची गुलाम हा लेख. अत्यंत लखलखीत तेजस्वी धारदार आणि स्वत्त्वाचे तेज असलेले विचार!!

**अमृता खंडेराव**

**बोधिसत्त्व फाउंडेशन, यवतमाळ, मो : ९५०३१ १२१११४**





# महाराष्ट्र हायब्रीड सीडस् कंपनी प्रायव्हेट लिमिटेड

ई-मेल : info@mahyco.com, वेब-साइट : www.mahyco.com

/MahycoSeeds /MahycoIndia /company/mahyco

# युगात्मा शरद जोशी कृषी जीवन गौरव पुरस्काराने सात व्यक्तींचा सन्मान

शेतकऱ्यांना सुखाने या सन्मानाने जगता यावे, यासाठी विविध क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या सात व्यक्तीना युगात्मा शरद जोशी कृषी जीवन गौरव पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले.

१. **मा. ॲड. वामनराव चटप**, माजी आमदार, चंद्रपूर यांना युगात्मा शरद जोशी कृषी अनमोलरत्न जीवन गौरव पुरस्कार
२. **मा. सुनील चरपे**, नागपूर यांना युगात्मा शरद जोशी कृषी पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार
३. **मा. रमेशभाई बिसानी** वर्धा यांना युगात्मा शरद जोशी कृषी दीपस्तंभ जीवन गौरव पुरस्कार
४. **मा. चिमणदादा पाटील**, जळगाव यांना युगात्मा शरद जोशी कृषी अभिव्यक्ती जीवन गौरव पुरस्कार
५. **मा. उत्तमराव वाबळे**, हिंगोली यांना युगात्मा शरद जोशी कृषी बळीराजा जीवन गौरव पुरस्कार
६. **मा. स्मिता गुरव**, नाशिक यांना युगात्मा शरद जोशी कृषी हिरकणी जीवन गौरव पुरस्कार
७. **मा. जयंत बापट**, यवतमाळ यांना युगात्मा शरद जोशी आदर्श पाईक जीवन गौरव पुरस्कार

या पुरस्काराचे वितरण वरिष्ठ पत्रकार मा. आदिनाथ चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख अतिथी सर्वश्री देशोन्नतीचे संपादक राजेश राजोरे, दिलीप भोयर, बाबुभाई जैन, निळकंठराव घवघवे, संमेलन संयोजक ॲड. सतीश बोरुळकर, स्वागताध्यक्ष ॲड. प्रदीप पाटील, कार्याध्यक्ष गंगाधर मुटे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

## ● पुरस्कार वितरण समारंभ ●




**युगात्मा शरद जोशी कृषी अनमोलरत्न जीवन गौरव पुरस्कार मा. ॲड. वामनराव चटप यांच्या वतीने त्यांचा मुलगा आशुतोष व सून स्नेहल चटप यांनी स्वीकारला.**



युगात्मा शरद जोशी कृषी दीपस्तंभ जीवन गौरव पुरस्कार मा. रमेशभाई बिसानी वर्धा यांचेवतीने निळकंठराव घवघवे यांनी स्वीकारला.



युगात्मा शरद जोशी कृषी पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना मा. सुनील चरपे, नागपूर




युगात्मा शरद जोशी कृषी अभिव्यक्ती जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना मा. चिमणदादा पाटील, जळगाव




युगात्मा शरद जोशी आदर्श पाईक जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना मा. जयंत बापट, यवतमाळ




युगात्मा शरद जोशी कृषी बळीराजा जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना मा. उत्तमराव वाबळे, हिंगोली



युगात्मा शरद जोशी कृषी हिरकणी जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना मा. स्मिता गुरव, नाशिक


हवं तेव्हा, हवं तिथच, हवं तितकच पाणी...
शेतीसाधन - सामुग्रीच्या गरजांचा जवळून अभ्यास करणं
व त्या सातत्यानं पुर्ण करणं हीच आमची "बांधिलकी"
जैन टर्बो स्लिम
जैन टर्बोलाईन
जैन टर्बो लाइन व
जैन टर्बो लाइन पीसी
जैन टर्बो एक्सेल प्लस
जैन टर्बोलाईन पी.सी.
IrriConnect
जैन ऑटोमेशन कंट्रोलर व सेंन्सर्स
टेंशोमिटर
सोलोनाईड व्हॉल्व
हवामान
दर्शक यंत्र
NUTRI CARE
जैन न्युट्रीकेयर
फर्टिगेशन यंत्रणा
जैन अॅटोमॅटीक स्क्रीन
फिल्टर्स
फर्टिगेशन डोझर पंप
जैन पाईप
जैन ठिबक
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी, ब्रह्मांडाचा भेद करी.
NUTRI CARE
फोन: ०२५७-२२५८०११; फॅक्स: ०२५७-२२५८१११; ई-मेल: jisl@jains.com; वेबसाईट: www.jains.com

BSE
INVESTORS' PROTECTION FUND

# बीएसई वर ट्रेड कमोडिटीज - भारताचा पहिला युनिव्हर्सल एक्सचेंज

**कमोडिटी डेरिव्हेटिव्हज:**

- कॉटन
- ग्वारसीड
- टर्मरिक
- चना
- सोयाबीन
- कैस्टरसीड
- गुआर गम
- गोल्ड
- सिल्व्हर
- कॉपर
- गोल्ड मिनी
- ओमान क्रूड ऑइल



कार्यक्षम खर्च | टाइमलाइनमध्ये कपात | कार्यक्षम किंमत शोध

व्यापक बाजार सहभाग | मजबूत जोखीम व्यवस्थापन प्रणाली | आधुनिक तंत्रज्ञान

अधिक माहितीसाठी, bdm@bseindia.com वर संपर्क साधा

६ मायक्रोसेकंदांच्या वेगासह जगातील सर्वात वेगवान एक्सचेंज.

www.bseindia.com | Follow us on: /BSEIndia | @BSEIndia | /BSEIndia | /BSEIndia